www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



जमीन मोजणीसाठीच्या फी मध्ये वाढ, मोजणीच्या निकषात बदल...!

पान २ वर....

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ



परराष्ट्र सचिवांनी दिली बांगलादेशला भेट

पान ५ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ
वर्ष - ०२ ■ अंक १९० ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, गुरुवार, १२ डिसेंबर २०२४ ■ रु. २/-
RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# मुंबईतील बस व्यवस्थापनाचा खाजगीकरणाचा प्रयोग अपयशी

## मुंबईकरांच्या जीवावर संकट

● मुंबई, विशाल कारंडे :

**मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील सार्वजनिक बस सेवा ही मुंबईकरांसाठी अत्यंत महत्त्वाची जीवनरेखा आहे. मात्र, मागील तीन वर्षांपासून खाजगी कंत्राटदारांच्या ताब्यात दिलेल्या बस व्यवस्थापनामुळे ही सेवा निष्काळजीपणे चालवली जात आहे. या हलगर्जीपणाचा थेट परिणाम मुंबईकरांच्या जीवावर होत असून, नुकत्याच झालेल्या अपघातांमध्ये सात निष्पाप मुंबईकरांचे मृत्यू व ५० पेक्षा जास्त लोक गंभीर जखमी झाले आहेत.**

मुंबई महापालिकेच्या ढिसाळ कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महापालिकेच्या प्रशासनाने खाजगीकरणाच्या नावाखाली बस सेवा पूर्णपणे बाजारू तत्त्वांवर चालवण्याचा जो निर्णय घेतला आहे, त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. दुर्दशा व निष्काळजीपणा: खाजगी कंत्राटदारांकडून सुरक्षितता नियमांचे उल्लंघन होत आहे.

खराब स्थितीत असलेल्या बस, अयोग्य प्रशिक्षण असलेले चालक, आणि वेळापत्रकाचा अभाव हे घटक अपघातांना कारणीभूत ठरत आहेत. मुंबईकरांच्या हक्कावर गदा: खाजगीकरणामुळे बसच्या भाड्यांमध्ये वाढ झाली असून, अनेक मार्गांवर सेवा कमी करण्यात आली आहे. यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अपघातानंतर कोणत्याही प्रकारची तातडीची मदत किंवा प्रशासनाची जबाबदारी दिसून येत नाही. मुंबई महानगरपालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे सामान्य मुंबईकरांचे प्राण धोक्यात आले आहेत. खाजगी कंत्राटदारांच्या अपयशी व्यवस्थापनाला पाठिंबा देऊन प्रशासनाने आपली जबाबदारी झटकली आहे. असा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते तथा युवक चे मुंबई अध्यक्ष अमोल मातेले यांनी केला आहे.





## 'कलम ४९८ अ'चा मोठ्या प्रमाणात दुरुपयोग – सर्वोच्च न्यायालय

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

विवाहित महिलांच्या पती आणि त्याच्या नातेवाईकांकडून होणाऱ्या छळास शिक्षा करणाऱ्या भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ अ याचा मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होत असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने मंगळवार दि. १० डिसेंबर रोजी म्हटले आहे. दारा लक्ष्मी नारायण आणि इतर विरुद्ध तेलंगणा राज्य आणि इतर या खटल्याची सुनावणी न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठासमोर झाली. यावेळी खंडपीठाने म्हटले, ज्या तरतुदीचा मूळ उद्देश महिलांना कौटुंबिक हिंसाचार आणि छळापासून संरक्षण करणे हा आहे, त्याचा काही महिलांकडून त्यांच्या पती आणि त्याच्या कुटुंबाला त्यांच्या अवास्तव मागण्या पूर्ण करण्यास भाग पाडण्यासाठी करण्यात येत असल्याच्या प्रकरणांमध्ये वाढ होताना दिसत आहे. पान २ वर

## ( ) थोडक्यात ( )



### दुर्गाडी किल्ल्याला छावणीचे रूप

**कल्याण :** दुर्गाडी किल्ल्याबाबत न्यायालयाचा निकाल आल्यानंतर हिंदुत्ववादी संघटनांसाह शिवसेनेने किल्ल्यावर जाऊन दुर्गा देवीच्या मंदिरात आरती करत जल्लोष केला. या दरम्यान परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे याच्यासह सहायक आयुक्त कल्याणजी घेटे हे दुर्गाडी किल्ले येथे पोलिस वर्गासह हजर राहत परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. यावेळी पोलिसांचा मोठा फौजफाटा किल्ल्यावर असल्याने दुर्गाडी किल्ल्याला छावणीचे रूप प्राप्त झाले होते. याचदरम्यान बाजारपेठ पोलिस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक आणि शिवसेना शहर प्रमुख रवि पाटील यांच्या मध्ये तू तु मे मे झाली. याप्रसंगी प्रसिद्धी माध्यमांना पोलीस उपयुक्तांनी प्रतिक्रिया दिली की, न्यायालयाच्या निकालानंतर तणावाचं वातावरण पाहता कल्याण दुर्गाडी किल्ला परिसरात पोलिसांचा मोठा फौजफाटा लावण्यात आला असून अफवांवर विश्वास ठेवू नये. शांतता भंग होऊ नये यासाठी पोलिसांनी काळजी घेतली असल्याचे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांनी सांगितले.

### साताऱ्यात ५ लाखांची लाच घेतल्याप्रकरणी न्यायाधीश ताब्यात



**सातारा -** सातारा लाचलुचपत विभागाने लाच घेतल्याप्रकरणी मोठी कारवाई केली आहे. फिर्यादीच्या वडिलांना जामीन देण्यासाठी ५ लाखांची मागणी करणारे तिघेजण एसीबीच्या जाळ्यात सापडले आहेत. या संशयितांमध्ये जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश धनंजय निकम यांचा समावेश आहे. तर आनंद मोहन खरात आणि किशोर संभाजी खरात अशी इतर दोघांची नावे आहेत. सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आणि पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ही संयुक्त कारवाई केली आहे. या प्रकरणी अधिक चौकशी सुरु आहे.

### मुंबई विमानतळावर १२.५ किलो सोने जप्त

**मुंबई :** मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावरील फूड कोर्टात कार्यरत असलेल्या विमानतळ कर्मचाऱ्यांच्या सिंडिकेटवर मोठी कारवाई करण्यात आली आहे. विमानतळावर विविध पदांवर काम करणाऱ्या ३ जणांसह ६ जणांच्या अटकेने सोन्याच्या तस्करीत गुंतलेल्या एका मोठ्या सिंडिकेटचा पर्दाफाश झाला आहे. आंतरराष्ट्रीय ट्रांझिट प्रवाशांकडून सोने मिळवून ते विमानतळाबाहेर पोचवण्यामध्ये गुंतल्याची विशिष्ट गुप्त माहिती च्या आधारे ही कारवाई करण्यात आली. गुप्त माहितीवर कारवाई करून, डीआरआय मुंबईच्या अधिकाऱ्यांनी विमानतळावर पाळत ठेवली आणि तस्करीच्या सोन्याच्या अशा दोन खेपा विमानतळाबाहेर वितरित केल्या जात असताना ही कारवाई केली.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या प्रमुख पदी रामेश्वर नाईक यांची नियुक्ती




● मुंबई, यश सावंत :

मुख्यमंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारल्या नंतर देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासकीय पातळीवर महत्त्वाचे बदल करण्यास सुरुवात केली आहे. मुख्यमंत्री कार्यालयाच्या सचिव पदी डॉ. श्रीकर परदेशी यांची नियुक्ती केल्यानंतर, आता मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या प्रमुख पदावर रामेश्वर नाईक यांची नेमणूक करण्यात आली आहे. यापूर्वी मंगेश चिवटे हे या पदावर कार्यरत होते.

राज्यातील आपत्तीग्रस्तांना तातडीने सहाय्यता देणे, हे मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे उद्दिष्ट असून पूर, दुष्काळ, आग यांमुळे होणारे अपघात अशा मोठ्या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधीत नागरिकांना "मुख्यमंत्री सहाय्यता निधी" मार्फत अर्थसहाय्य पुरविले जाते. तसेच समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दुर्धर आजारांवर उपचार करण्यासाठीही या निधीतून अर्थसहाय्य पुरविले जाते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात २०१४ साली राज्यात या कक्षाची स्थापना करण्यात आली होती. पान २ वर

## देशभरातील ९९४ मालमत्ता 'वक्फ बोर्डा'ने लाटल्या

● मुंबई, विशाल पाटील :

संसदेच्या हिवाळी अधिवेशनामध्ये मोदी सरकार आक्रमक झाले असून, त्यामुळे प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसला पळता भुई थोडी झाली आहे. देशातील अनेक घटनांवर एकामागोमाग एक गौप्यस्फोट करण्याची मालिका सरकारने कायम ठेवत, 'वक्फ बोर्डा'ने ९९४ मालमत्ता अनधिकृतरित्या गिळंकृत केल्याच्या घटनेवर सरकारने प्रकाश टाकला आहे. हिवाळी अधिवेशनात सरकारी पक्षाचे आक्रमक रूप पाहून हादरलेल्या काँग्रेसला सोमवार, दि. ९ डिसेंबर रोजी केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी अजून एक धक्का दिला.

'वक्फ'च्या काळ्या कारनाम्यांचा बुरखा टराटरा फाडताना केंद्रीय मंत्री रिजिजू यांनी एक अहवाल संसदेसमोर सादर केला. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी गटाचे नेते जॉन ब्रिटास यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना किरेन रिजिजू यांनी या अहवालातील माहिती संसदेसमोर सादर केली. त्यानुसार 'वक्फ बोर्डा'ने देशातील ९९४ मालमत्ता अनधिकृतरित्या बळकावल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. तसेच 'वक्फ'च्या आक्रमणाचे सर्वाधिक बळी हे तमिळनाडूतील नागरिक असल्याचे देखील रिजिजू यांनी सांगितले. पान २ वर




### कुर्ल्यानंतर पुन्हा बेस्ट बसचा अपघात

## सीएसएमटी परिसरात बसखाली आल्यामुळे पादचाऱ्याचा मृत्यू



● मुंबई, राकेश गायकवाड :

कुर्ला येथे बेस्टच्या एका बसने भरधाव वेगात अनेक वाहनांना धडक देत काही पादचाऱ्यांना उडवले होते. या दुर्घटनेत सात लोकांचा मृत्यू झाला असून ४९ लोक जखमी झाले. या अपघातामुळे मुंबई हादरल्यानंतर आता पुन्हा एकदा बेस्ट बसचा अपघात झाल्याची बातमी समोर येत आहे. सीएसएमटी परिसरात ए २६ क्रमाकांच्या बसने एका व्यक्तीला चिरडले. ज्यात सदर व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरात सदर अपघात घडला असून या अपघाताचा एक व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे. दरम्यान कुर्ला येथे सोमवारी झालेल्या बस अपघाताची चौकशी करण्यासाठी आणि तातडीने नुकसानभरपाई देण्यासाठी बेस्ट उपक्रमाने समिती स्थापन केली आहे. त्याचबरोबर मृतांच्या नातेवाईकांना तातडीची मदत म्हणून दोन लाख रुपये देण्याची घोषणाही करण्यात आली आहे. पान २ वर

## सरकारच्या भोंगळ कारभारामुळे मजुरांचे आठ कोटी थकले

### गोरगरीब आदिवासी मजूरांमधून तीव्र संताप

● पालघर, सुचिता सोनावणे:

पालघर जिल्ह्यात रोजगार हमी योजनेवर काम केलेल्या मजुरांच्या कोट्यावधी रुपये मजुरीचा गुंता पाचवीलाच पुजलेला आहे. रोजगार हमी योजनेवर काम केलेल्या मजुरांची राज्य शासनाकडून साडेतीन कोटीच्या जवळपास तर केंद्र शासनाकडे साडेचार कोटीच्या जवळपासची मजुरी गेल्या दोन-तीन महिन्यांपासून प्रलंबित आहे. त्यामुळे ग्रामीण दुर्गम भागातील गोरगरीब आदिवासी मजूर तीव्र संताप व्यक्त करत आहेत. प्रलंबित मजुरीचा प्रस्ताव योजनेच्या उपजिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने नागपूर रोहयो आयुक्त यांच्याकडे वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे. मात्र त्यानंतरही ही मजुरी थकीत असल्याने आयुक्त कार्यालय याकडे लक्ष देत नाही का, असा प्रश्न उपस्थित होतो. वाडा व जव्हार तालुक्यातील मजुरांची सर्वाधिक मजुरी प्रलंबित आहे. वाडा तालुक्यात दोन कोटी ७५ लाखाच्या जवळपास तर मोखाडा तालुक्यात तब्बल एक कोटी ७३ लाखाची हक्काची मजुरी आदिवासी व गोरगरीब मजुरांना मिळालेली नाही. त्यामुळे हे मजूर गावपाडे सोडून शहराकडे रोजगारासाठी जात आहेत. मजुरी प्रस्ताव तयार झाल्यानंतर त्याच्या मंजुरीसाठी नागपूर येथील रोहयो आयुक्त कार्यालयाकडे प्रस्ताव जातात. तेथून ही मजुरी प्राप्त होत असते. मात्र नेहमीच प्रक्रियेचा उशीर व इतर कारणांमुळे तीन चार महिने उशिराने मजुरी येत आहे. रोजगार हमी योजनेअंतर्गत दोन हजार कोटीच्या जवळपासचा राज्य निधी राखीव ठेवलेला आहे. पान २ वर



## ठाणे जिल्ह्यात कुपोषित बालकांची संख्या घटली

● ठाणे, रोहित जैसवाल :




कुपोषणाचा टक्का कमी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने समुपदेशन, प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष आहार अशी त्रिसूत्री कार्यक्रम राबवण्यात येत आहे. यासाठी महिला व बालविकास विभागामार्फत विशेष प्रयत्न सुरू असून ग्रामीण भागातील कुपोषित बालकांची संख्या सप्टेंबर २०२४ रोजी अखेर तीव्र कुपोषित (सॅम) ८८ तर मध्यम कुपोषित (मॅम) १ हजार ०२३ होती तर नोव्हेंबर २०२४ रोजी अखेर (तीव्र कुपोषित) सॅम २२ तर मध्यम कुपोषित (मॅम) ६२ कुपोषित बालकांची संख्या कमी करण्यात यश आले आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने समुपदेशन, प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष आहार अशी त्रिसूत्री कार्यक्रम १ हजार ६४७ अंगणवाडीतील ८३ हजार ४२७ बालकांसाठी राबवण्यात येत आहे. तसेच दत्तक पालक योजना, पालकसभा घेऊन मुलांचा दिनक्रम, आहाराच्या वेळा, चविष्ठ आणि तितकेच सकस अन्न बालकांना देण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येत आहे. कुपोषित बालकांची संख्या कमी करण्याच्या उद्देशाने आयआयटी मुंबई सारख्या नामांकित संस्थाचा देखील सहभाग घेण्यात आला असून बालकांची काळजी घेण्यासाठी व्हिडीओ मार्फत तसेच पालकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात येत असल्याची माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागुल यांनी दिली आहे.

गरोदरपणात मातेला योग्य सकस आहार न मिळाल्यास मूल कुपोषित जन्माला येण्याची शक्यता असते. तर मूल जन्मल्यानंतर त्याला मातेचे पुरेसे दूध व पोषण आहार न मिळाल्यास बालके कुपोषणाच्या विळख्यात अडकू शकतात. त्यामुळे गरोदरपणात व प्रसूती नंतर मातांना व सहा महिन्यांनंतर बालकांना नियमितपणे अंगणवाडी सेविकांमार्फत पोषण किट वाटप करण्यात येत आहे. पान २ वर



## सरकारमध्ये मंत्रीपद, तर विरोधी पक्षनेतेपदासाठी काँग्रेस, सेनेत स्पर्धा!

● नागपूर, नितीन देवळेकर :

येत्या सोमवारपासून राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात होत आहे. आज विधिमंडळ सचिवालय अधिकारी, कर्मचारी दाखल झाले. उद्या गुरुवारी सचिवालयाचे प्रशासकीय कामकाज सुरू होणार आहे. विरोधी पक्षनेतेपद मिळेल असे संख्याबळ विरोधकांकडे नसताना विरोधी पक्षनेता बंगला आणि त्यांच्या पत्र परिषदेची पूर्व तयारी सार्वजनिक बांधकाम विभागाने केली आहे. यावरून विरोधी पक्षनेतेपद विरोधकांना मिळणार असे संकेत आहेत. पान २ वर

## संपादकीय

# क्षमतांच्या आधारे विकासाला चालना

राज्यात शिक्षण, पर्यावरण, औद्योगिक, सामाजिक क्षेत्रांसह अनेक पातळीवर आव्हाने दिसतात. मुख्यत्वेकरून आर्थिक विकास घडवून आणताना विकासाला चालना देणारा निधी कसा उपलब्ध करता येईल, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. आता महाराष्ट्राचा जो कौल आहे आणि ज्या उत्साह व आत्मविश्वासानं हे सरकार स्थापन झालं आहे, त्यामुळं केंद्रातील सरकार डळमळीत करू शकणार्या शक्तींनाही वचक बसेल. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, ज्या पद्धतीनं शपथविधी समारंभ पार पडला तो एक सिग्नल आहे की, देवेंद्र फडणवीस हे आता राष्ट्रीय पातळीवरचे नेते म्हणून उदयास येताहेत. हा शपथविधी केवळ एका राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा नव्हता. भले ते राज्य महाराष्ट्रासारखं मोठं, महत्त्वाचं, देशावर प्रभाव असलेलं असेल, पण हा सिग्नल आहे की देवेंद्र फडणवीस यांची वाटचाल आता राष्ट्रीय पातळीवरचा नेता अशी सुरू झाली आहे.

शपथविधीला स्वतः पंतप्रधान, केंद्रीय मंत्रिमंडळातील टॉप तीन मानले जाणारे नेते, केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथसिंह होते, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन होत्या, गृहमंत्री अमित शहा होते, भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा होते, चंद्राबाबू नायडू होते, नितीशकुमार होते, आंध्र प्रदेशात चंद्राबाबूसोबत युतीत असणार्या पक्षाचे नेते पवन कल्याण होते. याप्रकारे अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्रातील पंतप्रधानांसह सर्व महत्त्वाचे मंत्री उपस्थित राहात असतील, तर लोकशाहीतील तो एक सिग्नलच आहे. जे घडतं आहे त्याला ऐतिहासिक स्थान आहे. त्याला मी म्हणतो आहे की, हा देवेंद्र फडणवीस यांचा राष्ट्रीय पातळीवरचा नेता म्हणून उदय आहे. असं असलं तरी हे सरकार बनवण्यासाठी १२ दिवस गेले हे काहीसं अनिष्ट झालं. २३ नोव्हेंबर रोजी लोकांनी कौल स्पष्ट दिला होता. पण मुख्यमंत्री कोण, उपमुख्यमंत्री कोण, खाती कोणती कुणाला मिळावीत, मागण्या काय आहेत त्यावरून चर्चा झाली. यासाठी झालेला विलंब टाळता आला असता. पण आता ही आव्हानं संपली आहेत. खरी आव्हानं आता सुरू झाली आहेत.

एक तर गोष्ट निश्चित आहे आणि ती कोणा राजकीय पक्षाशी संबंधित नाही की, गेला काही काळ विकासाच्या अनेक निर्देशांकांवर महाराष्ट्र मागे पडत होता. त्यामुळं पहिलं काम म्हणजे महाराष्ट्राच्या विकासाला गती देण्याचं आहे. महाराष्ट्राचं देशातील स्थान सर्वांत विकसित राज्य, नव्हे नव्हे देशाला विकसित करणारं राज्य असं असायला हवं. मी याला मुख्य आव्हान म्हणतो. कारण आता एक स्थिर सरकार, दूरदृष्टी ठेवून आखलेल्या योजना आणि सरकारी नोकरशाही यंत्रणेला गतिमान करून नेतृत्वाकडून या योजनांची पारदर्शक व काटेकोर अंमलबजावणी या माध्यमातून विकासाला वेग येणे गरजेचे आहे. विकासाला गती देण्यामधील मुख्य आव्हान युवापिढीला रोजगार मिळवून देणं आणि त्याच वेळी एआय, सेमीकंडक्टर यांसह जगामध्ये येणार्या सर्व अत्याधुनिकतेसाठी महाराष्ट्रातील नवी पिढी तयार करणं. यासाठी महाराष्ट्रातील शिक्षणपद्धती वर्ल्डक्लास म्हणजेच जागतिक दर्जाची असायला हवी. याखेरीज पर्यावरण ही समस्या जागतिक असली तरी पण त्याची महाराष्ट्रातील पावलं पर्यावरणाला अनुकूल असायला हवीत. उदाहरणार्थ, २०१४ ते २०१९ या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी 'जलयुक्त शिवार' ही योजना हाती घेतली होती. या योजनेबद्दल पक्षीय राजकारणातून ज्याला जे म्हणायचं ते म्हणू द्या. पण पर्यावरण आणि पाणी व जमिनीचं संवर्धन याला ती योजना, ती संकल्पना अतिशय महत्त्वाची होती. आता मुख्यमंत्रिपदाची सूत्रे पुन्हा हाती आल्यावर शाश्वत विकास किंवा सस्टेनेबल डेव्हलपमेंटला गती देणारे कार्यक्रम त्यांनी राबवायला हवेत. थेट विदेशी गुंतवणूक किंवा एफडीआय आणण्यामध्ये महाराष्ट्र आजही देशात पहिल्या स्थानी आहे. त्याची मुख्य कारणं महाराष्ट्राकडे आधीपासून असणारा बेस किंवा पाय हे आहे. आता त्याला नवी चालना देणं गरजेचं आहे. उदाहरणार्थ, सेमीकंडक्टर इंडस्ट्री किंवा युवापिढीचे कौशल्य वाढवण्याच्या योजना हे शिक्षणपद्धतीत आणावं लागेल. शाळा पातळीपासून जागतिक दर्जाचे अभ्यासक्रम बनले पाहिजेत. मुख्य म्हणजे नवं संशोधन, नवी बुद्धी यांना चालना देणारी शिक्षणपद्धती. मुख्य म्हणण्याचं कारण की, कोणाही युवकाला तू आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर कसा उभा राहू शकशील याचं शिक्षण देणारी शिक्षणपद्धती. केवळ नोकर्या शोधणारा होऊ नकोस, तर नोकर्या निर्माण करणारा व बनवणारी. स्वयंरोजगार ते उद्योजकतेचा विकास.


याखेरीज मराठी भाषेचंही संवर्धन झालं पाहिजे. लोकसभा निवडणुकांच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात दर्जा दिला, ही बाब स्वागतार्ह आहे. पण केवळ केंद्रानं अभिजात दर्जा दिल्यानं मराठी भाषेचा आणि मराठी माणसाचा विकास होणार नाही. मराठी भाषेत मुळातून काम होईल, नवं ज्ञान निर्माण होईल, संशोधन होईल आणि मुख्य म्हणजे मराठी माणूस जेव्हा जीवनाच्या सर्व क्षेत्रात कर्तृत्व करेल तेव्हा मराठी ही लोकभाषा होईल. यासाठी सरकारची भूमिका महत्त्वाची आहे. शेवटचा मुद्दा म्हणजे, महाराष्ट्राला साधावयाचा विकास, राज्य सरकारने प्रस्तावित केलेल्या योजना यांविषयी बोलताना अनेकदा राज्यावरील कर्जाच्या बोजाचा आणि सरकारी तिजोरीचा मुद्दा मांडला जातो. पण एक मूलभूत गोष्ट लक्षात घ्यायला हवी ती म्हणजे हा आर्थिक विकास साधण्याची क्षमता महाराष्ट्रात आहे. यासाठी आर्थिक व्यवस्थापन कौशल्यानं करावं लागेल. देशात आर्थिक शिस्तीसाठी फिस्कल रिस्पॉन्सिबिलिटी अँड बजेट मॅनेजमेंट ॲक्ट असा कायदा असून तो राज्यांसाठी बंधनकारक आहे. त्याचा भंग करता येत नाही. सार्वजनिक कर्ज घेताना या कायद्याची मर्यादा पाळावी लागेल. तसेच राज्याच्या जीडीपीच्या अडीच टक्क्यांपेक्षा कमी तूट असावी अशी तरतूद या कायद्यात आहे, तिचेही पालन करावेच लागेल.

या सर्व चौकटीत राहूनही अपेक्षित आर्थिक विकास घडवून आणणे आव्हानात्मक असले तरी ते निश्चित शक्य आहे. विकासाला चालना देणारा निधी कसा उपलब्ध करता येईल, हे आव्हान असलं तरी ते पेलण्याची क्षमता महाराष्ट्राकडे आहे आणि मुख्यमंत्रिपदी असणार्या देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या क्षमतांच्या आधारे विकासाला चालना देण्याचे कौशल्यही आहे.

# जमीन मोजणीसाठीच्या फी मध्ये वाढ, मोजणीच्या निकषात बदल...!







भूमी अभिलेख खात्याकडून जमीन मोजणीच्या धोरणात दोन महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. यात जमीन मोजणीचे प्रकार कमी करण्यात आले आहेत. याशिवाय, नवीन प्रकारांनुसार शुल्काच्या रकमेतही बदल करण्यात आला आहे. याआधी जमीन मोजणीचे ४ प्रकार अस्तित्वात होते. त्यामध्ये, साधी, तातडीची, अतितातडीची आणि अति अतितातडीची मोजणी असे ४ प्रकार होते. या प्रकारांनुसार ठराविक कालावधीत जमीन मोजणीची प्रक्रिया पूर्ण करावी लागत होती. आता नवीन सुधारणेनुसार, जमीन मोजणीचे दोनच प्रकार असणार आहेत आणि त्यानुसार शुल्कआकारलं जाणार आहे. जमीन मोजणीसाठी राज्यात आता दोनच प्रकार अस्तिस्वात असतील. नियमित मोजणी आणि द्रुतगती मोजणी असे हे प्रकार आहेत. नियमित मोजणी आधी या मोजणीला 'साधी मोजणी' म्हटलं जायचं. ती १८० दिवसांत पूर्ण करावी लागायची आणि त्यासाठी २ हेक्टरच्या मर्यादिपर्यंत १ हजार रुपये फी होती. नवीन धोरणानुसार, आता या मोजणीला 'नियमित मोजणी' म्हटलं जाईल, ती ९० दिवसांत पूर्ण करण्याचं बंधन असेल. नियमित मोजणीसाठी २ हेक्टरच्या मर्यादिपर्यंत २ हजार रुपये फी असेल आणि २ हेक्टरच्या पुढे प्रती २ हेक्टरसाठी १ हजार रुपये फी आकारली जाईल. द्रुतगती मोजणी पूर्वी १५ दिवसांत अति अतितातडीची करुन दिली जायची आणि त्यासाठी १२ हजार रुपये फी होती. नवीन धोरणानुसार, द्रुतगती मोजणी ३० दिवसांच्या आत पूर्ण करण्याचं बंधन आहे. द्रुतगती मोजणीसाठी २ हेक्टर मर्यादेपर्यंत ८ हजार रुपये फी असेल. २ हेक्टरच्या पुढे प्रती २ हेक्टरसाठी ४ हजार रुपये फी आकारली जाईल. याचा अर्थ पूर्वी जमीन मोजनीसाठीचा कमीत कमी दर १ हजार रुपये होता, तो आता २ हजार करण्यात आला आहे. नव्या बदलांनुसार, दोन प्रकारांमधील मोजणीसाठी म्हणजे नियमित मोजणीसाठी २ हजार आणि आणि द्रुतगती मोजणीसाठी ८ हजार रुपये आकारले जातील.

भूमी अभिलेख विभागाच्या प्रशासकीय परिपत्रकानुसार, खर्चात मोठ्या प्रमाणात झालेली वाढ लक्षात घेता मोजणी फी दरामध्ये वाढ करणं आवश्यक आहे. त्यानुसार मोजणी फीचे प्रचलित दर आणि कालावधी व प्रकार यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. २०१२ नंतर जमीन मोजणीच्या शुल्कात वाढ करण्यात आली आहे. या १२ वर्षांमध्ये कर्मचाऱ्यांचे पगार वाढले. याशिवाय, जमीन मोजणीची प्रक्रिया पूर्वी पूर्णपणे ऑफलाईन पद्धतीनं केली जायची. आता ही प्रक्रिया डिजिटल पद्धतीनं केली जात आहे. त्यासाठीच्या तंत्रज्ञानाचाही खर्च वाढल्याचं भूमी अभिलेख विभागाकडून सांगितले आहे. नवीन निकष कधीपासून लागूहोणार ? नवीन प्रणालीची अंमलबजावणी १ नोव्हेंबर २०२४ पासून करण्यात येईल, असं भूमी अभिलेख विभागाच्या पत्रकात नमूद करण्यात आलंय. १ नोव्हेंबर २०२४ पूर्वी मोजणी फी सहित जे अर्ज दाखल झालेत त्यांना नवीन दर लागू राहणार नाहीये. मात्र १ नोव्हेंबर २०२४ रोजी किंवा या तारखेनंतर मोजणीसाठी जे अर्ज दाखल होतील त्यांना सुधारित दर लागू होणार आहेत, असं या पत्रकात स्पष्ट केलंय. पण राज्यात निवडणूक आचारसंहिता असल्यानं नवीन प्रणालीची १ अंमलबजावणी डिसेंबरपासून सुरू झाली आहे.

**दिनेश शिंदे**

पान १ वरून...

## ‘कलम ४९८ अ’चा मोठ्या...

न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले की, अलिकडच्या काही वर्षांत देशभरात वैवाहिक विवादांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. तसेच विवाह संस्थेतील वाढत्या कलह आणि तणावामुळे पती आणि त्याच्या कुटुंबाविरूद्ध पत्नीकडून वैयक्तिक सूड उगवला गेला आहे. वैवाहिक विवादांदरम्यान अस्पष्ट आरोप करून भादंविच्या कलम ४९८ अ सारख्या तरतुदींचा गैरवापर करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. त्यामुळे अशा प्रकरणांची तपासणी न झाल्यास कायदेशीर प्रक्रियेचा दुरुपयोग होईल.

तेलंगणा उच्च न्यायालयाने खटला रद्द करण्यास नकार दिल्याच्या विरोधात पती आणि त्याच्या कुटुंबीयांनी दाखल केलेल्या अपीलवर न्यायालयात सुनावणी सुरू होती. पतीने घटस्फोटासाठी याचिका दाखल केली असता पत्नीने पती व सासरच्यांविरुद्ध वरील गुन्हे दाखल केले होते. युक्तिवाद विचारात घेतल्यानंतर, सर्वोच्च न्यायालयाने असे मानले की पत्नीने दाखल केलेले खटले वैयक्तिक नाराजी आणि तक्रारींचे निराकरण करण्यासाठी होते आणि पत्नी मूळत: तिच्या संरक्षणासाठी असलेल्या तरतुदींचा गैरवापर करत होती.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधी...

एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे काम अधिक प्रभावी होण्यामध्ये मंगेश चिवटे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. मात्र, आता मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचा कारभार रामेश्वर नाईक यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

रामेश्वर नाईक यांनी छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातून कला शाखेत पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. २०१४ साली ते वैद्यकीय शिक्षण आणि जलसंपदा विभागात सल्लागार म्हणून नियुक्त झाले होते. पुढील काळात त्यांनी काही धर्मादायी संस्थांमध्ये सल्लागार आणि विश्वस्त म्हणून काम पाहिले. जुलै २०२१ मध्ये रामेश्वर नाईक यांची वैद्यकीय समितीच्या सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आली. तर ऑक्टोबर २०२३ मध्ये राज्यातील धर्मादायी संस्थांकडून चालवण्यात येणाऱ्या रुग्णालयांचे नियमन करणाऱ्या हेल्प डेस्क प्रमुख म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली. महायुती सरकारच्या गेल्या कार्यकाळात रामेश्वर नाईक यांनी उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे प्रथम प्रमुख म्हणून कार्यभार सांभाळला होता.

रामेश्वर नाईक यांनी विविध पदांवर काम करताना राज्यात अनेक ठिकाणी तब्बल ११५ वैद्यकीय शिबिरे घेतली आहेत. या शिबिरांच्या माध्यमातून ब्रेस्ट कॅन्सर, लेप्रसी, डायबेटिसच्या हजारो रुग्णांवर उपचार करण्यात आले. याशिवाय, रामेश्वर नाईक यांच्या माध्यमातून कुपोषण निर्मुलन, अवयवदान यासाठीही शिबिरे घेण्यात आली आहेत. तसेच ८९ मोतीबिंदू उपचार शिबिरे आणि २२ रक्तदान शिबिरांचे आयोजनही डॉ. नाईक यांनी केले आहे.

## देशभरातील ९९४ मालमत्ता...

हडप केलेल्या ९९४ मालमत्तांपैकी ७३४ मालमत्ता या एकट्या तामिळनाडू राज्यातील असल्याचे देखील सरकरच्या वतीने सांगण्यात आले. तमिळनाडूच्या खालोखाल आंध्र प्रदेशमधील १५२, पंजाबमध्ये ६३, उत्तराखंडमधील ११, तर जम्मू आणि काश्मीर या राज्यातील दहा मालमत्ता बळकावण्यात आल्याची माहिती केंद्रीय अल्पसंख्याक मंत्र्यांनी सादर केली.

त्याचवेळी २०१९ सालापासून केंद्र सरकारने ‘वक्फ बोर्डा’ला एकही जमीन दिली नसल्याचे केंद्रीय गृहनिर्माण आणि शहर मंत्रालयाने राज्यसभेत स्पष्ट केले. पण, राज्यांनी ‘वक्फ बोर्डा’ला किती जमीन दिली, याची माहिती केंद्राकडे उपलब्ध नसल्याचे देखील केंद्र सरकारच्या वतीने सांगण्यात आले.

भारतीय पुरातत्त्व खात्याला देखील ‘वक्फ’चा विळखा

‘भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण’ (एएसआय) विभागाच्या २५० मालमत्तादेखील ‘वक्फ’ने हडप केल्या आहेत. पुरातत्त्व खात्याच्या माध्यमातून हा मुद्दा संयुक्त संसदीय समितीसमोर मांडण्यात येणार आहे. पूर्वी ही संख्या १२० असल्याचे सांगितले जात होते. मात्र, तपासणीनंतर हा आकडा २५० वर पोहोचला आहे.

## सीएसएमटी परिसरात बसखाली...

अपघातानंतर मुंबई वाहतूक पोलिसांनी एक्सवर वाहतूक वळविल्याची माहिती दिली. “बेस्ट बस अपघातामुळे वालचंद हिराचंद मार्ग जंक्शनवर (आझाद मैदान) वाहतूक संथ गतीने सुरू आहे”, अशी माहिती एक्सवर देण्यात आली.

दरम्यान सोमवारी (९ डिसेंबर) रात्री कुर्ला पश्चिम येथील महापालिकेच्या एल विभाग कार्यालयाजवळ बेस्ट बसचा भीषण अपघात झाला. बेस्ट बसने अनेक वाहने आणि पादचाऱ्यांना धडक दिली. या अपघातामध्ये ४९ जण जखमी झाले. यापैकी सात जणांचा मृत्यू झाला. कुर्ला येथील भाभा रुग्णालयामध्ये चार, शीव रुग्णालय, कोहिनूर रुग्णालय, हबीब रुग्णालयात प्रत्येकी एका रुग्णाचा मृत्यू झाला. या अपघातामुळे कुर्ला आणि आसपासच्या परिसरात शोकाकळा पसरली आहे.

या घटनेनंतर आता ज्या बसने भरधाव वेगात धडक दिली, त्या बसमधील आतला सीसीटीव्ही व्हिडीओ समोर आला आहे. अपघात होत असताना बसमधील प्रवाशी जीव मुठीत धरून उभे असताना दिसत आहेत. बस थांबल्यानंतर प्रवाशांनी बसमधून पळ काढला.

## सरकारच्या भोंगळ कारभारामुळे...

या राखीव निधीतून किमान थकीत निधी देणे अपेक्षित आहे. एकीकडे आदिवासींसाठी भरघोस योजना व निधी दिल्याचे सरकार सांगते. तर दुसरीकडे याच आदिवासी मजुरांची कोट्यावधीची मजुरी थांबवून त्यांच्यासोबत अन्याय करते असे आरोप मजूर वर्ग जिल्हाभरातून आता सरकार विरो धात करू लागले आहेत. नवीन सरकार आमच्या समस्यांकडे आता तरी जातीने लक्ष देणार आहे का, असा प्रश्न त्यांच्याकडून उपस्थित होत आहे.

एकीकडे आदिवासींसाठी भरघोस योजना व निधी दिल्याचे सरकार सांगते. तर दुसरीकडे याच आदिवासी मजुरांची कोट्यावधीची मजुरी थांबवून त्यांच्यासोबत अन्याय करते असे आरोप मजूर वर्ग जिल्हाभरातून आता सरकार विरोधात करू लागले आहेत. नवीन सरकार आमच्या समस्यांकडे आता तरी जातीने लक्ष देणार आहे का, असा प्रश्न त्यांच्याकडून उपस्थित होत आहे.

स्थानिक स्तरावर रोजगार प्राप्त व्हावा या उद्देशाने सुरू केलेली रोजगार हमी योजनेची उद्दिष्टे अशा प्रकारामुळे असफल होऊ लागल्याचे दिसून येत आहे. वेळेवर मजुरी मिळत नसल्याने मजूर वर्ग गाव पाडे सोडून पोटाची खळगी भरण्यासाठी शहरी भागाकडे स्थलांतर करत आहेत. त्यामुळे या प्रलंबित मजुरीच्या दुष्टचक्रातून या मजुरांची सुटका केव्हा होणार, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. ठेवली आहे. त्यामुळे स्थलांतर फोफावल्याचे दिसून येत आहे. गेल्या दोन- तीन महिन्यांची आठ कोटीच्या जवळपासची मजुरी थकीत असल्यामुळे मजूर वर्ग चिंतेत आहेत. स्थलांतरामुळे कुपोषण, बेरोजगारी, शोषण, वेठबिगारी असे अनेक प्रश्न डोकेवर काढत आहेत.

पालघर जिल्ह्यात प्रामुख्याने जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा अशा भागांमध्ये स्थानिक स्तरावर रोजगार प्राप्त नसल्यामुळे तेथील मजूर वर्ग रोजगार हमी योजनेच्या कामावर जात आहेत. कामांच्या माध्यमातून मनुष्य दीन व मजूर उपस्थिती या तालुक्यांमध्ये चांगली आहे. या चार तालुक्याच्या तुलनेत डहाणू, वसई, तलासरी, पालघर हे शहरी भागातील तालुके असल्याने योजनेच्या कामावर येथे कमी मजूर असतात. मात्र या तालुक्यातही मजुरांची मजुरी थकीत आहे.

जिल्ह्यातील दुर्गम ग्रामीण भागामध्ये आपला उदरनिर्वाह करत असतात. मात्र त्यांना मजुरीच वेळी प्राप्त झाली नाही. तर त्यांना कुटुंबाचा गाडा हाकणे कठीण होऊन बसत आहे. परिणामी ही कुटुंबे रोजगाराच्या शोधात गावे सोडून शहरी भागात स्थलांतरित होत आहेत. पालघर जिल्ह्यात दोन लाखांपेक्षा जास्त मजूर नोंदणीकृत असून त्यांना जॉब कार्ड मिळालेले आहे. सेल्फवर असलेल्या कामांपैकी सद्यस्थितीत १३ ते १४ हजार कामे संपूर्ण जिल्ह्यात सुरू आहेत. १४ हजार कामे संपूर्ण जिल्ह्यात सुरू आहेत. कृषी विभाग, वनविभाग, वन विकास महामंडळ, सामाजिक वनीकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, रेशीम विभाग अशा यंत्रणा व ग्रामपंचायत स्तरावर ही कामे सुरू आहेत. या कामांवर मजूरवर्ग अकुशल मजूर म्हणून कामे करतात. त्याचे मोजमाप रजिस्टर तयार होते. तेथून मजुरी प्रस्ताव मंजुरी मिळून ते पैसे थेट मजुरांच्या खात्यात वर्ग केले जातात. दिवसाला २९७ रुपये इतकी मजुरी प्राप्त होते. मात्र गेल्या दोन महिन्यांपासून आजतागायत ही मजुरी प्रलंबित आहे.

पालघर जिल्ह्यात स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध नसल्याने रोजगार हमी योजनासारखी प्रभावी योजना अंमलात आणली गेली. मात्र या योजनांवर काम करणाऱ्या मजुरांची केंद्र व राज्य सरकारमार्फत देण्यात येणारी मजुरी थकीत मजुरी मिळण्याला विलंब झाला ही वस्तुस्थिती आहे. हातावर पोट असणाऱ्या भागांमध्ये हा विलंब अक्षम्य आहे. या प्रकारामुळे रोजगार हमी योजनेचा मुख्य उद्देश सफल होत नसल्यामुळे हे दुष्टचक्र आहे.

## ठाणे जिल्ह्यात कुपोषित...

जिल्हा प्रशासनाकडून गरोदर व स्तनदा मातांना बाळंतवीडा, कुपोषित मुलांना पोषकवडी, स्तनदा मातांना पाळणा इ. नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. त्याचबरोबर विविध स्वंयसेवी संस्था (उदा.स्नेहा फाऊंडेशन, अन्नदा फाऊंडेशन इ.) च्या मदतीने डोळखांब/ शहापूर प्रकल्पातील कुपोषित बालकासाठी कामकाज करण्यात येत आहे. परिणामी प्रतीवर्ष कुपोषीत बालकांमध्ये सुधारणा टक्केवारीत वाढ होत आहे.

जिल्ह्यातील मागील तीन महिन्यातील कुपोषित बालकांची संख्या

सप्टेंबर २०२४ रोजी अखेर तीव्र कुपोषित (सॅम) ८८ तर मध्यम कुपोषित (मॅम)१ हजार ०२३, ऑक्टोबर २०२४ रोजी अखेर तीव्र कुपोषित (सॅम) ७६ तर मध्यम कुपोषित (मॅम) १ हजार ००९, नोव्हेंबर २०२४ रोजी अखेर तीव्र कुपोषित (सॅम) ६६ तर मध्यम कुपोषित (मॅम) ९६१ आहेत.

## सरकारमध्ये मंत्रीपद तर विरोधी...

विधानसभेत शिवसेना उबाठा गटाला विरोधी पक्षनेतेपद मिळाल्यास विधान परिषदेत आम्हाला संधी मिळावी अशी काँग्रेसची अपेक्षा आहे. एकीकडे सरकारमध्ये मंत्री पदासाठी चांगल्या खात्यासाठी लॉबिंग सुरू असताना विरोधकांमध्ये विरोधी पक्ष नेतेपदासाठी स्पर्धा सुरू आहे.

यावेळी १६ ते २१ डिसेंबर असे एकच आठवड्याचे अधिवेशन होणार असले तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्यांच्या होमपीचवर अडचणीत आणण्यासाठी विरोधक अपुरे संख्याबळ असूनही एकवटण्याची शक्यता आहे. शिवसेना उबाठाचे नेते उद्धव ठाकरे पूर्णवेळ नागपुरात राहणार असल्याची माहिती आहे. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत कार्यकर्त्यांचा जोश कायम राहण्याच्या दृष्टीने हिवाळी अधिवेशन गाजविण्याचा विरोधकांचा प्रयत्न दिसत आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# मध्यस्थी प्रक्रिया जनजागृतीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणात शिबिर संपन्न

## मधस्थी प्रक्रियेमध्ये वकिलांची भूमिका महत्त्वाची - जी. जी. भन्साली



**ठाणे (रोहित जैसवाल) :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण व मुख्य मध्यस्थी केंद्र, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने मध्यस्थी जनजागृती शिबिराचे आयोजन केले होते. मध्यस्थी प्रक्रियेमध्ये वकिल मध्यस्थींची भूमिका खूप महत्वाची आहे. आपल्या अनुभवाचा फायदा घेवून वकिल मध्यस्थी हे यशस्वीपणे मध्यस्थी प्रक्रिया राबवू शकतात, असे प्रतिपादन जिल्हा न्यायाधीश जी. जी. भन्साली यांनी यावेळी केले.

या शिबिरात प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा न्यायाधीश जी. जी भन्साली, ठाणे जिल्हा वकील संघटनेचे उपाध्यक्ष सलील भुटाला तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे ईश्वर सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ठाणे जिल्हा न्यायालयातील विधी सेवा सदन येथे हा कार्यक्रम पार पडला. या शिबिरात ठाणे जिल्ह्यातील पॅनल विधीज्ञ, मध्यस्थी विधीज्ञ, लोकअभिरक्षक, विधी शाखेचे विद्यार्थी व इतर नागरिक उपस्थित होते.

या शिबिराची सुरूवात "एक मुट्ठी आसमा पर हक हमारा भी तो है" या नालसा गीतानंतर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सूर्यवशी यांनी प्रास्ताविक करून सुरुवात केली.

**आजपर्यंत २३३० प्रलंबित प्रकरणे निकाली - ईश्वर सुर्यवंशी**

सन २०२१ पासून ठाणे जिल्ह्यातील न्यायालयांनी मध्यस्थी प्रक्रियेसाठी प्रलंबित २२९५ प्रकरणे आणि ३५ दाखलपूर्व अशी एकूण २३३० प्रकरणे मध्यस्थी प्रक्रियेच्या माध्यमातून सामोपचाराने मिटल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सूर्यवंशी यांनी यावेळी दिली. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी नुकत्याच झालेल्या एका यशस्वी मध्यस्थी प्रकरणाचे उदाहरण दिले. प्रॉपर्टीसंबंधीच्या या प्रकरणात सामनेवाले पक्षकार हे न्यायाधीन बदी म्हणून तुरूगात हात व व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे अर्जदार व सामनेवाले यांच्यामध्ये यशस्वीपणे मध्यस्थी घडवून आणण्यात आली व यावरूनच मध्यस्थी प्रक्रिया ही किती महत्वाची व आवश्यक आहे हे त्यांनी पटवून दिले.

त्यानंतर प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा न्यायाधीश जी. जी. भन्साली यांनी उपस्थितांना मध्यस्थीबाबत मार्गदर्शन केले. एलआयसीचे जसे ब्रीद वाक्य आहे "जिंदगी के साथ भी जिंदगी के बाद भी" तसेच न्यायालयाचे सुध्दा ब्रीद वाक्य होवू शकते "जनम से पहले भी, मरने के बाद भी", कारण व्यक्ती जन्माला येण्याआधीपासून त्याच्या ज्या वैद्यकीय चाचण्या वगैरे होतात त्यावर न्यायालयाचा अंकुश असतो. तसेच व्यक्ती मृत्यु पावल्यानंतरही होणाऱ्या प्रक्रियांवर न्यायालयाचा अंकुश असतो.

भन्साली म्हणाले की, मध्यस्थी प्रक्रियेमध्ये सर्वप्रथम मध्यस्थी वकिलांनी दोन्ही पक्षकारांना आपण तटस्थ असल्याचे सागून मध्यस्था प्राक्रयच महत्व पटवून द्यायला हवे. तेव्हा दोन्ही पक्षकार हे मोकळेपणाने आपले म्हणणे मांडू शकतील. तसेच मध्यस्थी प्रक्रियेसंबंधी वेगवेगळ्या कायद्यांची माहिती सुध्दा श्री. भन्साली यांनी यावेळी दिली.

तसेच मध्यस्थी विधीज्ञ राजेंद्र नलगे यांनी मध्यस्थी म्हणून काम करत असताना येणारे अनुभव सांगुन विधीज्ञांना मध्यस्थी प्रक्रियेमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे मत व्यक्त केले.

त्याप्रमाणे ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सूर्यवंशी यांनी वाढती लोकसंख्या व न्यायालयातील वाढत्या खटल्यांचा आलेख पाहता त्वरीत व खर्चीविरहीत न्याय मिळण्यासाठी मध्यस्थी ही प्रभावी प्रणाली असून त्याचा अवलंब करण्याचे तसेच मध्यस्थी प्रक्रियेच्या यशामध्ये विधीज्ञांची महत्वाची भूमिका असून विधीज्ञांनी मध्यस्थी प्रक्रियेसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

# पथदिवे आणि पदपथांवर शौचालय उभारण्याची आई एकविरा महिला मंडळाची मागणी

## केडीएमसी आयुक्त आणि शहर अभियंत्यांना दिले पत्र





**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण पूर्वेतील आडीवली परिसरात विविध ठिकाणी पथदिवे बसविण्याची आणि कल्याण पूर्वेतील चक्कीनाका ते नेवाळी या दरम्यान पदपथावर महिलांच्या सोयीसाठी शौचालय बांधण्याची मागणी आई एकविरा महिला मंडळाने केली असून याबाबत मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा सोनी क्षीरसागर आणि समाजसेवक संदीप क्षीरसागर यांनी केडीएमसी आयुक्त इंदुराणी जाखड आणि शहर अभियंता अनीता परदेशी यांची भेट घेत निवेदन दिले आहे.

आडीवली परिसरात विविध ठिकाणी मंडळाच्या वतीने पथदिवे लावण्याकरता वारंवार केडीएमसीच्या विद्युत विभागाकडे पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. तरी देखील अजून पथदिवे उभारण्यात आलेले नाही. आडीवली येथील गणेश चौक ते जयराम सदन, राजाराम पाटील नगर, सद्गुरू अपार्टमेंट, प्रदीप नगर ते अनंता भोईर चौक, अनंता भोईर चौक, ऑस्टीन नगर, महावीर फर्निचर, शनिवार पार्क मार्ग, चेतन पार्क मार्ग, नवरत्न रेसिडेन्स, दुर्गा देवी मंदिरापर्यंत, म्हसोबा मंदिर, आडिवली तलावाच्या चारी बाजुने या परिसरांची यादी देण्यात आली आहे.

या विभागात खूप मोठ्या प्रमाणात अंधार असून रात्री अपरात्री महिला व नागरिकांना त्यांचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे याची त्वरित दखल घेऊन पथदिवे उभारण्याची मागणी आई एकविरा महिला मंडळाने केली आहे.

तसेच कल्याण पूर्वेतील चक्कीनाका ते श्री मलंग रोड, नेवाळी नाक्यापर्यंत खूप मोठया प्रमाणात नागरीक वस्ती निर्माण झाली असून महिलांना प्रवासादरम्यान शौचालयासाठी गैरसोय होत आहे. त्यामुळे महिलांना खूप मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे महिलांसाठी कोणत्याही प्रकारचे शौचालय उपलब्ध नाही. महिलांचा हा त्रास कमी करण्याकरिता चक्कीनाका ते नेवाळी नाका दरम्यान पदपथावर शौचालय बांधण्यात यावे असे देखील निवेदन मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.

दरम्यान येत्या एक महिन्यात पथदिव्यांच्या कामाची सुरुवात होणार असल्याचे आश्वासन शहरा अभियंता अनिता परदेशी यांनी दिले असून महिलांसाठीच्या शौचालयासाठी लवकरात लवकर पाहणी करण्यात येईल असे आश्वासन आयुक्तांनी दिले असल्याचे क्षीरसागर यांनी सांगितले.

# पिरबाबा यात्रेला आज १२ डिसेंबर पासून सुरुवात!

**मुरबाड (विशाल पाटील) -** मुरबाड-कल्याण या राष्ट्रीया महामार्गावर असलेल्या उमरोली (बळेगाव) येथील शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या व नवसाला पवणाऱ्या पिरबाबा यात्रेला १२ डिसेंबर २०२४पासून अर्थात गुरुवार पासुन सुरूवात होत आहे . सदरची यात्रा तीन दिवस चालनार आहे. या यात्रेत हजारो भक्त, भाविक दाखल होतात. तसेच पिरसाई युवा प्रतिष्ठाण तर्फे मोठया प्रमाणात सहकार्य केले जात आहे. त्यामुळे सर्व धर्माचे लोक पिरबाबाचे पुजन करतात याला विशेष महत्व दिले जात आहे. त्यामुळे मुरबाडमध्ये पिरबाबा यात्रेला फार विशेष महत्व आहे. तसेच गुरुवार म्हणुन गावकरी यात्रेचे पुजन करतात. या यात्रेमध्ये विशेषत: कोणताही अनुचित प्रकार घडत नाहि त्यामुळे दिवसेंदिवस पिरबाबाच्या यात्रेचे महत्व वाढत आहे. तसेच टोकावडे पोलिस ठाण्यामार्फत चोख बदोबस्त ठेवण्यात आल्याची माहिती टोकवडे पोलीस सहाय्यक निरीक्षक दिनकर चकोर यांनी दिली आहे.

या यात्रेत गुरुवारी पिरबाबाची पालखी निघते. तसेच गुरुवार म्हणून महिला वर्ग निरंकर उपवास करुन पिरबाबाच्या चरनी नारळाची तळी फोडली जाते. त्यामुळे पिरबाबाच्या यात्रेला संपुर्ण तालुक्यातुन जोरदार प्रतिसाद भाविकांचा मिळत असतो. १२ डिसेंबर २०२४रोजी भव्य पालखी सोहळा,,तसेच मनोरंजनाचे साधन म्हणुन १३डिसेंबर २०२४रोजी लोकनाटय (बहुरंगी तमाशा) १४ डिसेंबर २०२४ स्टेप आर्ट डान्स अकॅडमी प्रस्तुत शृंगार नृत्यांचा कार्यक्रम,,१५डिसेंबर२०२४ रोजी सामुदायिक हरिपाठ व महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या यात्रेसाठी नियोजक पिरसाई युवा प्रतिष्टान, ग्रामस्थ मंडळ उमरोली, भीमज्योत मित्र मंडळ आयोजक,, तरुण तसेच वयोवृध्द व परीसरातील नागरीक यांची टिम यात्रा शांत वातावरणात पार पाडण्यासाठी सज्ज झाली आहे. त्यामुळे मुरबाडच्या पिरबाबाला पाहण्यासाठी तीन दिवसात हजारो भक्त-भाविक दाखल होतील व यात्रेला विशेष महत्व वाढेल अशी माहिती उमरोली (बळेगाव) याा गावचे युवा नेतृत्व महेश पवार यांनी दिली.

# माजी पोलीस महासंचालक संजय पांडे यांचा जबाब नोंदविण्याचे काम ठाणे पोलिसांकडून सुरू



**ठाणे (सम्यक कासारे) :** राज्याचे माजी पोलीस महासंचालक संजय पांडे यांच्यासह काही पोलीस अधिकाऱ्यांवर कथित खोट्या गुन्ह्यात अडकविण्याचा आणि खंडाणीचा गुन्हा दाखल आहे. या प्रकरणात पांडे यांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. या प्रकरणात जबाब नोंदविण्यासाठी संजय पांडे हे बुधवारी ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाच्या कार्यालयात दाखल झाले असून पोलिसांकडून त्यांचा जबाब नोंदविण्याचे काम सुरू झाले आहे. पांडे यांना याबाबत विचारले असता, पोलिसांनी आरोप दाखल केले आहेत, त्यांनाच माहित अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

मुंबई येथे व्यवसायिक संजय पुनमिया वास्तव्यास आहेत. मिरा भाईंदरमध्ये काही विकासकांनी युएलसीच्या सवलतीसाठी बनावट प्रमाणपत्रे मिळवली होती.या बनावट पत्राच्या आधारे विकासकांनी महापालिकेकडून परवानग्या घेऊन इमारतींचे बांधकाम केले आणि शासनाची आर्थिक फसवणूक केली होती असा आरोप आहे. याप्रकरणी २०१६ मध्ये ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. संजय पुनमिया यांच्याविरोधात देखील हा गुन्हा दाखल होता. या प्रकरणाचा तपास २०२१ मध्ये पुन्हा सुरू करून राज्याचे तत्कालीन पोलीस महासंचालक संजय पांडे यांनी या प्रकरणात खोट्या पद्धतीने अडकविण्याची धमकी देऊन पैसे उकळल्याचा आरोप पुनमिया यांनी केला होता. तसेच, शासनाचे खोटे पत्र तयार करून विशेष सरकारी वकिल नेमण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

याप्रकरणी ठाणेनगर पोलीस ठाण्यात माजी पोलीस महासंचालक संजय पांडे, साहाय्यक पोलीस आयुक्त सरदार पाटील, तत्कालीन पोलीस निरीक्षक मनोहर पाटील, वकील शेखर जगताप, श्यामसुंदर अग्रवाल, शुभम अग्रवाल, शरद अग्रवाल यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात आता पांडे यांचा जबाब घेण्यास सुरुवात झाली आहे. पांडे यांना याबाबत विचारले असता पोलिसांनी आरोप दाखल केले आहेत, त्यांनाच माहित असे पांडे म्हणाले.

# किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत ठाणे जिल्ह्यात १३ धान/भरडधान्य खरेदीसाठी केंद्रे

**ठाणे ( विशाल पाटील ):-** किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांकडील धान पणन हंगाम २०२४-२५ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत धान/भरडधान्य खरेदी करण्यासंदर्भात शासनाने मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार ठाणे जिल्ह्यात बिगर आदिवासी क्षेत्रात महाराष्ट्र स्टेट को. ऑप. मार्केटिग फेडरेशन व आदिवासी विकास क्षेत्रामध्ये आदिवासी विकास महामंडळ या दोन यंत्रणांमार्फत धान खरेदी प्रक्रिया राबविण्यात येणार असून जिल्ह्यात या खरीप पणन हंगामाकरिता धान (भात) खरेदी करण्यासाठी खरेदी केंद्रे सुरु करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना जिल्हा समन्वय समितीच्या बैठकीत देण्यात आल्या आहेत. या यंत्रणांमार्फत जिल्ह्यात १३ ठिकाणी खरेदी केंद्रे सुरू करण्यात येणार असून यामध्ये शहापूर तालुक्यातील दोन नव्या केंद्रांचा समावेश आहे.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांकडील धान पणन हंगाम २०२४-२५ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत धान/भरडधान्य खरेदी करण्यासाठी शासनाने धान व भरडधान्य खरेदी करण्यासाठी बिगर आदिवासी क्षेत्रात महाराष्ट्र स्टेट को. ऑप. मार्केटिंग फेडरेशन, मुंबई व आदिवासी क्षेत्रामध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक या दोन अभिकर्ता संस्थांची नियुक्ती केली आहे. त्यानुसार या संस्थांचे ठाणे जिल्ह्यामध्ये जिल्हा मार्केटिंग अधिकारी, ठाणे आणि प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, प्रादेशिक कार्यालय जव्हार, जि.पालघर हे कार्यरत आहेत.

शासन निर्णयातील आधारभूत किंमती सर्व साधारण गुणवत्ता व दर्जा पुढीलप्रमाणे:-

पीक:- धान / भात - साधारण (एफ. ए. क्यू.), आधारभूत किंमत रुपये - २ हजार ३००, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष द्यावयाचा दर रुपये - २ हजार ३००. "अ" दर्जा - आधारभूत किंमत रुपये - २ हजार ३२०, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष द्यावयाचा दर रुपये - २ हजार ३२०. भरडधान्य:- ज्वारी (संकरित) - आधारभूत किंमत रुपये - ३ हजार ३७१, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष द्यावयाचा दर रुपये - ३ हजार ३७१, ज्वारी (मालदांडी) - आधारभूत किंमत रुपये -३ हजार ४२१, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष द्यावयाचा दर रुपये - ३ हजार ४२१. बाजरी - आधारभूत किंमत रुपये - २ हजार ६२५, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष द्यावयाचा दर रुपये - २ हजार ६२५. मका - आधारभूत किंमत रुपये - २ हजार २२५, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष द्यावयाचा दर रुपये - २ हजार २२५. रागी - आधारभूत किंमत रुपये -४ हजार २९०, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष द्यावयाचा दर रुपये -४ हजार २९०.

**धान खरेदीचा कालावधी:-**


खरिप पणन हंगाम हा दि.१४ ऑक्टोबर २०२४ ते दि.३१ जानेवारी २०२५ या कालावधीत राहील. तसेच रब्बी पणन हंगाम (रब्बी/उन्हाळी) केंद्र शासनाकडून प्राप्त सूचनानुसार राहील.

ठाणे जिल्ह्यामध्ये बिगर आदिवासी क्षेत्रात महाराष्ट्र स्टेट को. ऑप. मार्केटिग फेडरेशन व आदिवासी विकास क्षेत्रामध्ये आदिवासी विकास महामंडळ या दोन यंत्रणा कार्यरत असून त्यांच्या मार्फत खालील प्रमाणे केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत.

## धान खरेदी करण्यासाठी धान खरेदी केंद्रे पुढीलप्रमाणे:-

- अभिकर्ता संस्था - महाराष्ट्र स्टेट को. ऑप. मार्केटिंग फेडरेशन मर्या. तर्फे जिल्हा मार्केटिंग अधिकारी ठाणे.
- धान खरेदी केंद्राचे ठिकाण - मुरबाड तालुका - मुरबाड, भिवंडी तालुका – पडघा, दुगाड फाटा, झिडके व कल्याण तालुका - चवरे (मामनोली).
- अभिकर्ता संस्था - महाराष्ट्र राज्य सह. आ.वि.महा.मर्या. तर्फे प्रादेशिक व्यवस्थापक, महा. रा.सह. आ. वि. महा, प्रादेशिक कार्यालय जव्हार, जि. पालघर.
- धान खरेदी केंद्राचे ठिकाण - शहापूर तालुक्यातील - चोंढे (डोळखांब संस्था), मुर्गाव, सावरोली, मुरबाड तालुक्यांतील - धसई, माळ, पाटगांव, ही मागील वर्षातील सुरु ठेवण्यात येणारी केंद्रे असून शहापूर तालुक्यात आटगाव संस्था, सापगांव संस्था ही २ नवीन खरेदी केंद्रे २०२४-२५ मध्ये सुरू करण्यात येत आहेत, असे ठाणे जिल्हा पुरवठा अधिकारी विकास गजरे यांनी कळविले आहे.

# मानपाडा-बाह्यवळण रस्ता ते कोपर रस्त्यामधील अडथळा दूर



**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** येथील पूर्वेतील नांदिवली पंचानंद भागातील स्वामी समर्थ चौकात पालिकेच्या २४ मीटर रूंदीच्या विकास आराखड्यामधील रस्त्यात दहा वर्षापूर्वी उभारण्यात आलेली एक बेकायदा इमारत पालिकेच्या ई प्रभाग तोडकाम पथकाने मंगळवारी जमीनदोस्त केली. या कारवाईमुळे मानपाडा रस्ता, स्टार कॉलनी, पी अॅन्डी टी कॉलनी, हनुमान मंदिर, बाह्यवळण रस्ता ते कोपर या विकास आराखड्यातील रस्ता तयार करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

कल्याण डोंबिवली पालिकेच्या विकास आराखड्यात मानपाडा छेद रस्त्यावरील स्टार कॉलनी, हनुमान मंदिर, समर्थ चौक, बाह्यवळण रस्ता ते कोपर हा २४ मीटरचा प्रस्तावित रस्ता आहे. या रस्त्याचे स्टार कॉलनी ते हनुमान मंदिरापर्यंतचे सीमेंट कॉंक्रिट रस्त्याचे काम दोन वर्षापूर्वी पूर्ण झाले. या रस्त्यामध्ये मीलन सोसायटी ते समर्थ चौक दरम्यान विकास आराखड्यातील रस्त्यात दहा वर्षापूर्वी बांधलेली ओम रेसिडेन्सी इमारत आणि सहा व्यापारी गाळे होते. या इमारतीत रहिवास होता. या रस्त्याचे काम मागील दोन वर्षापासून रखडले होते.

ई प्रभागाचे तत्कालीन साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी विकास आराखड्यातील रस्त्याचे काम पूर्ण होणे आवश्यक असल्याने या रस्ते कामात अडथळा येणाऱ्या समर्थ चौकातील ओम रेसिडेन्सी इमारतीमधील १६ रहिवाशांना घरे आणि व्यापाऱ्यांना गाळे खाली करण्याच्या यापूर्वी नोटिसा दिल्या होत्या. दरम्यानच्या काळात पावसाळा सुरू झाला. त्यानंतर विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने पालिकेला रस्त्यामधील या बेकायदा बांधकामांवर कारवाई करता आली नव्हती. ओम रेसिडेन्सीमधील रहिवाशांनी स्वत:हून घरे रिकामी करून दिली होती. मंगळवारी सकाळी ई प्रभागाचे विद्यमान साहाय्यक आयुक्त चंद्रकांत जगताप आणि त्यांच्या पथकाने ही इमारत जमीनदोस्त केली. यावेळी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

समर्थ चौकातील अतिक्रमणे हटविल्याने मीलन सोसायटी ते समर्थ चौकातील कॉंक्रीट रस्त्याचे काम पूर्ण करणे ठेकेदाराला शक्य होणार आहे. समर्थ चौक, स्वामी समर्थ मठ, बाह्यवळण रस्ता (टिटवाळा-शिळफाटा) ते कोपर पर्यंतचा विकास आराखड्यातील रस्त्यांची बांधणी करणे पालिकेला शक्य होणार आहे. या रस्त्यामुळे येत्या काळात मानपाडा रस्त्यावरून येणारा प्रवासी वाहनाने स्टार कॉलनी, समर्थ चौकातून बाह्यवळण रस्त्याने कोपर भागात, तसेच माणकोली उड्डाण पुलाच्या दिशेने जाऊ शकणार आहे. कोपर, माणकोली पुलाकडील वाहने समर्थ चौकातून मानपाडा रस्ता किंवा शिळफाटाकडे जाऊ शकतील.




## अलका कुबल यांनी 'मंगला' सिनेमासाठी केलं शिवाली परबचं कौतुक; म्हणाल्या...

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या लोकप्रिय कार्यक्रमातून घराघरात पोहोचलेली शिवाली परब आता विविधांगी भूमिकेत पाहायला मिळत आहे. कधी चित्रपटात, तर कधी अल्बम साँगमध्ये शिवाली दिसत आहे. काही आठवड्यांआधी तिचा 'पाणीपुरी' नावाचा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस आला होता. या चित्रपटात शिवालीसह मकरंद देशपांडे, विशाखा सुभेदार, कैलाश वाघमारे अशी तगडी कलाकार मंडळी होती. त्यानंतर आता शिवाली एका वेगळ्या भूमिकेत मोठ्या पडद्यावर झळकणार आहे.

सत्य घटनेवर आधारित असलेल्या 'मंगला' चित्रपटात सुप्रसिद्ध गायिकेचा जीवनप्रवास पाहायला मिळणार आहे. याच चित्रपटात शिवाली परब चेहऱ्यावर ॲसिड हल्ला झालेल्या मंगलाच्या भूमिकेत झळकणार आहे. १७ जानेवारी २०२५ रोजी 'मंगला' चित्रपट प्रदर्शित होणार आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर आणि म्युझिक लाँच सोहळा पार पडला. यावेळी ज्येष्ठ अभिनेत्री अलका कुबलसह शशांक शेंडे यांनी शिवालीच्या कामाचं भरभरून कौतुक केलं.

अभिनेत्री अलका कुबल म्हणाल्या, "आमच्या शिवालीचं मनापासून कौतुक करावंस वाटतं. बऱ्याच नायिका मी किती सुंदर दिसते, मी मेकअपमध्ये किती छान दिसते, हे बघत असतात. अशावेळी शिवालीचा चित्रपटामध्ये ९० टक्के असा मेकअप होता. त्या मुलीने तो केला आणि ती १२-१२ तास मेकअपमध्ये असायची. त्यामुळे मी शिवालीचं मनापासून अभिनंदन करते."

तसंच अभिनेते शशांक शेंडे म्हणाले की, ज्या वयात नटूथटून कॅमेरासमोर ती दिसते आहे. अशा परिस्थितीत अशा पद्धतीचं शिवधनुष्य उचलून काम करणं हे खरंच कठीण आहे. मला तिचं मनापासून कौतुक आहे.


दरम्यान, शिवाली परबचा कामाबद्दल बोलायचं झालं तर, ती 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाबरोबर इतर काम लीलया सांभाळत आहे. आता ती मराठी रंगभूमीवर पाऊल ठेवणार आहे. प्रसाद खांडेकर लिखित, दिग्दर्शित 'थेट तुमच्या घरातून' या नाटकाच्या माध्यमातून शिवाली नाट्य क्षेत्रात पदार्पण करत आहे. या नाटकात शिवालीसह प्रसाद खांडेकर, ओंकार राऊत, भक्ती देसाई, प्रथमेश शिवलकर आणि नम्रता संभेराव पाहायला मिळणार आहे. २१ डिसेंबरपासून हे नाटक रंगभूमीवर येणार आहे.

# 'बेबी जॉन'मध्येही ॲटलीने बदलला नाही पॅटर्न?

बॉलिवूड अभिनेता वरुण धवनचा मोस्ट अवेटेड चित्रपट 'बेबी जॉन'चा ट्रेलर आज रिलीज झाला आहे. या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित होताच तो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला. चाहत्यांना तो खूप आवडला आणि लोकांनी त्याचे खूप कौतुकही केले. मात्र, चित्रपटाचा ट्रेलर पाहिल्यानंतर काही लोक हे हुबेहूब जवानासारखे असल्याचेही म्हणत आहेत. यावर चाहत्यांचे काय म्हणणे आहे ते जाणून घेऊया?

### 'बेबी जॉन' चित्रपटाची 'जवान' चित्रपटाशी तुलना

खरं तर, 'बेबी जॉन' चित्रपटाचा ट्रेलर समोर येताच लोकांनी वरुण धवनचे खूप कौतुक केले आहे. या ट्रेलरमध्ये ॲक्शन, रोमान्स, हिंसाचार आणि कॉमेडी सर्व काही पाहायला मिळत आहे आणि सलमान खानचा कॅमिओ चाहत्यांसाठी एका मोठ्या सरप्राईजपेक्षा कमी नाही. आता या






चित्रपटाची कथा ॲटली यांनी लिहिली असल्याने लोकांच्या या चित्रपटाकडून मोठ्या अपेक्षा आहेत, मात्र चित्रपटाचा ट्रेलर पाहिल्यानंतर काही लोकांनी याची तुलना 'जवान'शीही केली आहे. चित्रपटाच्या ट्रेलरवर टिप्पणी करताना, एका वापरकर्त्याने लिहिले की बेबी जॉन हा थेरीचा रिमेक आहे, ज्याने जवानचे दिग्दर्शनही केले होते. आणखी एका युजरने लिहीले की, 'तरुणाई'. तिसऱ्या यूजरने 'बेबी जॉन आणि जवान' असे लिहिले आहे. आणखी एका युजरने लिहिले की, 'बेबी जॉन आहे की जवान?'. हा ट्रेलर पाहिल्यानंतर लोकांनी अशा प्रतिक्रिया दिल्या आहेत. तथापि, चित्रपटाच्या ट्रेलरला बहुतेक सकारात्मक प्रतिक्रिया मिळाल्या आहेत आणि लोकांनी त्याचे कौतुक केले आहे. परंतु आता हा चित्रपट प्रदर्शित झाल्यावर चाहत्यांचा याला काय प्रतिसाद मिळतो हे पाहणे उत्कंठाचे ठरणार आहे.

### हा चित्रपट 25 डिसेंबरला प्रदर्शित होणार आहे

वरुण धवनचा हा चित्रपट २५ डिसेंबरला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. चाहत्यांना या चित्रपटाची खूप उत्सुकता आहे आणि प्रत्येकजण त्याच्या प्रदर्शनाची आतुरतेने वाट पाहत आहे. केवळ चाहत्यांनाच नाही तर निर्मात्यांनाही या चित्रपटाकडून मोठ्या अपेक्षा आहेत. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर कसा कमाई करतो हे पाहणे बाकी आहे. मात्र, कोणत्याही चित्रपटासाठी बॉक्स ऑफिसवर धमाका करणे ही मोठी गोष्ट आहे. सलमान खानचा कॅमिओ असलेला हा चित्रपट तिकीट खिडकीवर किती कमाल करेल हे पाहणे उत्सुकतेचा होणार आहे.



## कॉन्सर्टमध्येच उठून जाणाऱ्या राजकारण्यांना सोनू निगमचा सल्ला

भारतातील अनेक दिग्गज गायकांपैकी एक म्हणजे सोनू निगम . त्याचा आवाज सर्वांनाच मंत्रमुग्ध करतो. 'संदेसे से आते है' ते 'अभी मुझ मे कही' सारखी अनेक सुपरहिट गाणी गायली. सोनू निगम अगदी ठरवूनही बेसुरा गाणार नाही इतकी त्याची सुरांवर पकड आहे. नुकतंच राजस्थानमध्ये सोनूची कॉन्सर्ट झाली. यावेळी राजस्थानचे मुख्यमंत्री कॉन्सर्ट सुरु असताना मध्येच उठून निघून गेले. यावर कॉन्सर्ट संपल्यानंतर सोनूने सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर करत राजकारण्यांना सुनावलं आहे.

सोनू निगमने इन्स्टाग्रामवर व्हिडिओ शेअर करत म्हटले, "नुकतीच जयपूरमध्ये एक कॉन्सर्ट झाली. 'रायझिंग राजस्थान' खूप छान शो झाला. चांगले चांगले रसिक आले होते. प्रतिष्ठित शो होता. जगभरातील लोक राजस्थानची शान वाढवण्यासाठी आले होते. मुख्यमंत्रीही होते, इतरही काही मंत्री होते. शोच्या मध्यातच सीएम साहेब आणि बाकी नेते उठून गेले. त्यामुळे माझं सर्व राजकारण्यांना एकच आवाहन आहे जर तुम्हीच तुमच्या कलाकाराचा आदर करणार नाही तर मग बाहेरचे लोक तरी का करतील? ते काय विचार करतील? अमेरिकेत कोणी परफॉर्म करतोय आणि त्यांचे राष्ट्राध्यक्ष उठून जातील असं तर मी कधीच पाहिलं नाही. सांगून जातील किंवा थांबतील."

तो पुढे म्हणाला, "माझं तुम्हाला निवेदन आहे की जर तुम्हाला जायचंच असेल ना तर तुम्ही येऊच नका. किंवा शो सुरु होण्यापूर्वीच निघून जा. कोणत्याही कलाकाराच्या परफॉर्मन्स वेळी उठून निघून जाणं हे योग्य नाही. सरस्वती मातेचा हा अपमान आहे. कारण हे माझ्या लक्षात आलं नव्हतंच पण जेव्हा तुम्ही गेलात तेव्हा मला अनेक मेसेज आले की तुम्ही असे राजकारण्यांसाठी परफॉर्मन्स करत जाऊ नका. जे जातात त्यांना कलेचा आदर नसतो. माझी विनंती आहे की जर तुम्हाला जायचंच असेल तर परफॉर्मन्स आधीच जा. बसूच नका. मला ठाऊक आहे तुम्ही व्यस्त असता.


## वरुण धवनचा रावडी अंदाज आणि जबरदस्त ॲक्शन असलेल्या 'बेबी जॉन'चा ट्रेलर प्रदर्शित



'बेबी जॉन' या आगामी हिंदी सिनेमाचा टीझर प्रदर्शित झाल्यापासून या सिनेमाविषयी प्रेक्षकांमध्ये कमालीची उत्सुकता वाढली होती. नुकतंच वरुण धवन, वामिका गब्बी, ॲटली आणि निर्माता मुराद खेतानी आणि प्रिया अटली यांच्या उपस्थितीत या सिनेमाचा ट्रेलर प्रदर्शित झाला.

कालीस यांनी या सिनेमाचे दिग्दर्शन केले असून या ट्रेलरमध्ये ॲक्शन, मनोरंजन, क़ॉमेडी आणि डान्सच्या जबरदस्त ट्रॅकचा दमदार कॉम्बिनेशन आहे. प्रसिद्ध संगीतकार एस. थमन यांनी दिलेले संगीत आणि पार्श्वसंगीत (बीजीएम) ट्रेलरला एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवते. या सिनेमाविषयी व्यक्त होताना वरुण धवन म्हणाला की, "'बेबी जॉन'चा मी एक भाग होता आला मला खूप आनंद आहे. हा सिनेमा खूपच भावनिक आहे आणि स्टोरीलाईन बद्दल म्हणायचं तर हा सिनेमाच खूप पॉवरफुल जर्नी आहे. यामधील पात्रं साकारण्याचा अनुभव अविस्मरणीय होता. ट्रेलरमध्ये या कथेची तीव्रता आणि झलक पाहायला मिळते.

## सिद्धार्थ चांदेकरने बायकोसाठी घेतला हटके उखाणा



मराठी कलाविश्वातील आघाडीचा अभिनेता सिद्धार्थ चांदेकर सध्या त्याच्या 'फसक्लास दाभाडे' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. 'झिम्मा' चित्रपटाच्या दोन्ही भागांच्या यशानंतर आता अभिनेता व दिग्दर्शक हेमंत ढोमे याने दिवाळीच्या मुहूर्तावर नव्या चित्रपटाची घोषणा केली. हा चित्रपट म्हणजे 'फसक्लास दाभाडे'. आता येत्या जानेवारी महिन्यात २४ तारखेला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या पार्श्वभूमीवर नुकतंच या चित्रपटातील हळदीचं नवकोरं गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे.

'आता सुरु होणार लग्नाचा खरा फसक्लास हंगाम...उद्यापासून अख्खी फॅमिली नाचणार!' असं कॅप्शन देत या गाण्याची पहिली झलक दिग्दर्शकाने सोशल मीडियावर शेअर केली आहे. या गाण्याचं नाव 'यल्लो यल्लो' असं आहे. या गाण्याच्या लॉन्चला चित्रपटातील सगळीच कलाकार मंडळी तसेच संगीत दिग्दर्शक सुद्धा उपस्थित होते. यावेळी सगळ्यांनी गालावर हळद देखील लावली होती. तसेच हेमंत ढोमेने या लॉन्च इव्हेंटला जबरदस्त डान्स केल्याचं देखील पाहायला मिळालं.

## भीती आणि हास्याचा दुहेरी डोस घेऊन येतोय अक्षय कुमार; २ एप्रिल २०२६ तारखेला 'भूत बंगला' चित्रपट होणार प्रदर्शित

बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमार लवकरच 'भूत बंगला' या आगामी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सप्टेंबर महिन्यात त्याने या चित्रपटाची घोषणा केली होती. चित्रपटाची घोषणा झाल्यापासून चाहत्यांच्या मनात हा चित्रपट केव्हा प्रदर्शित होणार याबाबत उत्सुकता आहे. अशात आता बॉलीवूडचा खिलाडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अक्षयने 'भूत बंगला' चित्रपटाबाबत एक महत्त्वाची अपडेट दिली आहे. अक्षय कुमारने त्याच्या




इन्स्टाग्राम अकाउंटवर एक पोस्टर शेअर केले आहे. त्यात त्याने चित्रपट प्रदर्शित केव्हा होणार याची माहिती दिली आहे. तसेच चित्रपटाच्या शूटिंगबद्दल अपडेट दिली आहे.

अक्षयने शेअर केलेल्या चित्रपटाच्या पोस्टरमध्ये तो एका बंगल्यावर हातात एक दिवा घेऊन बसला आहे. तसेच यावर चित्रपट २ एप्रिल २०२६ रोजी चित्रपट प्रदर्शित होणार असल्याची तारीख लिहिण्यात आली आहे. अभिनेत्याने यावर कॅप्शनमध्ये लिहिले, "माझे आवडते कलाकार प्रियदर्शन यांच्यासह काम करण्यासाठी मी फार उत्सुक आहे.

आजपासून आम्ही 'भूत बंगला' चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात करीत आहोत. हा भीती आणि हास्याचा दुहेरी डोस तुमच्यासाठी २ एप्रिल २०२६ ला तयार असेल. तोपर्यंत तुमच्या सदिच्छा सोबत असाव्यात." अक्षय कुमारचा 'भूत बंगला' हा एक हॉरर कॉमेडी चित्रपट आहे. याआधी अक्षयने प्रियदर्शन यांच्या 'भूल भुलैया' या चित्रपटात काम केले आहे. त्याच्या या चित्रपटावर प्रेक्षकांनी भरभरून प्रेम केले होते. आता पुन्हा एकदा ही जोडी एकत्र काम करणार असल्याने प्रेक्षकांच्या मनात 'भूत बंगला' पाहण्याची उत्सुकता वाढली आहे. प्रियदर्शन दिग्दर्शित भूत बंगला या चित्रपटाची निर्मिती शोभा कपूर, एकता आर. कपूर, बालाजी मोशन पिक्चर्स, केप ऑफ गुड फिल्म्स प्रॉडक्शन हाउसद्वारे होणार आहे.



## बॉलीवूडची 'स्त्री' अन् 'स्पायडरमॅन' जेव्हा एकत्र येतात

बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री श्रद्धा कपूरने नुकतेच रेड सी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलच्या रेड कार्पेटवर तिच्या मोहक अंदाजाने सर्वांचे लक्ष वेधले. झगमगत्या गाउनमधील श्रद्धाचे तेजस्वी रूप आणि तिच्या केसांच्या लूकची चर्चा सोशल मीडियावर सुरू झाली . मात्र, तिच्या लूकपेक्षा जास्त चर्चा तिच्या आणि अँड्र्यू गारफिल्डच्या फोटोंची झाली.

जगातील विविध सेलिब्रिटी ज्या रेड सी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलला हजेरी लावतात रेड कार्पेटवर 'स्पायडरमॅन' फेम अभिनेता अँड्र्यू गारफिल्ड आणि श्रद्धा कपूर एकत्र आले होते. रेड कार्पेटवर येण्यापूर्वी श्रद्धा आणि अँड्र्यू गारफिल्डने थोडा वेळ गप्पा मारल्या आणि नंतर एकत्र पोज दिल्या. श्रद्धा आणि गारफिल्डची ही जोडी पाहून चाहत्यांनी सोशल मीडियावर चर्चेला उधाण आले. अनेकांनी श्रद्धाच्या हॉलिवूड डेब्यू करायला हवा अशा कमेंट केल्या. श्रद्धा आणि अँड्र्यूच्या एकत्र फोटोंनी इंटरनेटवर धुमाकूळ घातला. एका चाहत्याने कमेंट केली, "श्रद्धाचा खूपच जबरदस्त दिसत आहे. ती हॉलिवूडमध्येही कमाल करेल. तिचे उच्चार कौशल्य अप्रतिम आहे." दुसऱ्या एका चाहत्याने लिहिले, "अँड्र्यू गारफिल्ड आणि श्रद्धा कपूर??? २०२४ हे खरोखरच अजब वर्ष आहे." आणखी एका चाहत्याने सांगितले, "अँड्र्यू गारफिल्ड आणि श्रद्धा कपूर भेटले यावर अजूनही विश्वास बसत नाही."

श्रद्धाने हॉलीवूडमध्ये पदार्पण करण्याचा निर्णय घेतल्यास, ती धनुष, आलिया भट्ट, तब्बू, ईशान खट्टर यांसारख्या भारतीय कलाकारांच्या यादीत सामील होईल, ज्यांनी अमेरिकन चित्रपट आणि वेब सिरीजमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत.




**मेष** – कौटुंबिक जबाबदारी वाढेल. सामुदायिक वादात अडकू नका. इतरांच्या आनंदात सहभागी व्हाल. योग्य निर्णय घेऊ शकाल.

**वृषभ** – आर्थिक व्यवहार सावधगिरीने करावेत. योग्य मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा. मित्र परिवारात वाढ होईल. घरातील कामे करता येतील.

**मिथुन** – अवाजवी कामे अंगावर घेऊ नयेत. मनाजोगी खरेदी करता येईल. दानधर्माचे पुण्य पदरी पडेल. वृद्ध व्यक्तींसाठी धावपळ होईल.

**कर्क** – कामातील उत्साह वाढीस लागेल. स्वत:च्या हिमतीवर कामे पूर्ण कराल. गैरसमजुतीतून त्रास संभवतो. व्यवहारी दृष्टिकोन ठेवाल.

**सिंह** – उधार उसनवारीचे व्यवहार करू नयेत. घरगुती कामे वेळेत पार पडतील. कामानिमित्त प्रवास कराल. आपली उत्तम छाप पाडाल.

**कन्या** – मानपमानाचे प्रसंग येऊ शकतात. जोडीदाराशी विचार विनिमय करावा. तुमचे व्यक्तिमत्त्व बहरेल. नोकरीत काम वाढेल.

**तूळ** – हाताखालील लोकांचे सहकार्य मिळेल. कामातील उत्साह वाढेल. स्पर्धकांवर मात करता येईल. तुमच्या शब्दाला वजन प्राप्त होईल.

**वृश्चिक** – तुमच्यातील उद्योगशीलता वाढेल. आध्यात्मिक अनुभूतीचा लाभ मिळेल. नवीन आव्हान पेलाल. कार्याला दिशा मिळेल.

**धनु** – भावंडांचे प्रश्न समोर येतील. नातेवाईकांना मदत करावी लागेल. खंबीरपणे एखादा निर्णय घ्याल. तुमच्या कामाचे कौतुक होईल.

**मकर** – कौटुंबिक खर्च आटोक्यात ठेवावा. जवळचा प्रवास मजेत पार पडेल. मित्रांची नाराजी दूर करावी. धंद्यात वाढ करता येईल.

**कुंभ** – कौटुंबिक प्रश्न सुटतील. कधीही नियमबाह्य कामे करू नका. उत्तम वाहन सौख्य लाभेल. आपल्या तब्येतीची काळजी घ्यावी.

**मीन** – नोकरदार वर्गाला चांगले यश मिळेल. मेहनतीला मागेपुढे पाहू नका. फार उतावीळपणा करू नका. कामानिमित्त प्रवास घडेल.

# परराष्ट्र सचिवांनी दिली बांगलादेशला भेट

## अल्पसंख्याकांवर होणाऱ्या हल्ल्यांबद्दल व्यक्त केली चिंता

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा) :** भारताच्या शेजारी असलेल्या बांगलादेशात अल्पसंख्याकांवर होत असलेल्या हल्ल्यांमुळे भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी बांगलादेशला भेट दिली. यावेळी त्यांनी बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार डॉ. मुहम्मद युनूस आणि परराष्ट्र व्यवहार सल्लागार महंमद तौहीद हुसेन यांची भेट घेतली. यावेळी मिस्री यांनी बांगलादेशात अल्पसंख्याकांवर होत असलेल्या हल्ल्यांबद्दल चिंता व्यक्त केली. भारत बांगलादेशासोबत 'सकारात्मक, रचनात्मक आणि परस्पर फायदेशीर' संबंध निर्माण करू इच्छित आहे, असे मिस्री यांनी यावेळी सांगितले.



सोमवारी ढाका येथे आल्यावर मिस्री यांनी बांगलादेशचे परराष्ट्र सचिव मसूद बिन मोमेन यांच्याशीही चर्चा केली. परस्पर विश्वास, आदर आणि एकमेकांच्या चिंता आणि हितसंबंधांबद्दल संवेदनशीलतेवर आधारित बांगलादेशसोबत सकारात्मक आणि रचनात्मक संबंध निर्माण करण्याच्या भारताच्या इच्छेचा भारतीय परराष्ट्र सचिवांनी पुनरुच्चार केला. भारत-बांगलादेश संबंधांमध्ये लोक हे प्रमुख आहेत यावर भर देऊन मिस्री यांनी नमूद केले की भारताचे विकास सहकार्य आणि बांगलादेशसोबत बहुआयामी प्रतिबद्धता – कनेक्टिव्हिटी, व्यापार, उर्जा, ऊर्जा आणि क्षमता-निर्मिती यांचा समावेश – बांगलादेशच्या लोकांना फायदा होण्याच्या उद्देशाने आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परराष्ट्र सचिवांनी काही अलीकडील घडामोडी आणि मुद्द्यांवरही चर्चा केली आणि विशेषत: अल्पसंख्याकांच्या सुरक्षा आणि कल्याणाशी संबंधित भारताच्या चिंता व्यक्त केल्या. सांस्कृतिक, धार्मिक आणि राजनैतिक मालमत्तांवर झालेल्या हल्ल्यांच्या काही खेदजनक घटनाही त्यांनी मांडल्या. ऑगस्टमध्ये पंतप्रधान शेख हसीना यांच्या सरकारची हकालपट्टी झाल्यानंतर सत्तापालटानंतर ही भेट भारताची बांगलादेशसोबतची पहिली उच्चस्तरीय भेट आहे. परराष्ट्र सचिवांची भेट द्विपक्षीय संबंध टिकवून ठेवणे आणि मजबूत करणे, सहकार्याच्या प्रमुख क्षेत्रांमध्ये प्रगती वाढवताना सामायिक समस्यांचे निराकरण करणे यांसाठी महत्त्वपूर्ण मानली जाते.

### मीरा रोड दंगल प्रकरण

# १४ मुस्लिम तरुणांना उच्च न्यायालयाकडून जामीन

**मुंबई (यश सावंत) :** जानेवारी महिन्यात अयोध्येत झालेल्या राममूर्ती प्राणप्रतिष्ठापनेच्या पूर्वसंध्येला मीरा रोड येथे उसळलेल्या जातीय हिंसाचाराप्रकरणी अटकेत असलेल्या १४ मुस्लिम तरुणांना उच्च न्यायालयाने नुकताच जामीन मंजूर केला.



अयोध्येतील राममूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा साजरा करण्यासाठी निघालेल्या हिंदूच्या ताफ्यावर हल्ला करण्याचा याचिकाकर्त्यांचा पूर्वनियोजित कट होता हे पुराव्यांचा विचार करता ठामपणे सांगता येत नाही, घटनेचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद चित्रण पाहिल्यानंतर याचिकाकर्त्यांनी तक्रारदार अथवा इतर कोणावरही हल्ला केल्याचे दिसत नाही, असे निरीक्षणही न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार यांच्या एकलपीठाने १४ कथित आरोपींना दिलासा देताना नोंदवले. त्याचप्रमाणे, सर्व याचिकाकर्ते हे जानेवारीपासून कोठडीत आहेत आणि या खटल्याची सुनावणी लवकरात लवकर पूर्ण होण्याची शक्यता फारच कमी आहे. त्यामुळे, याचिकाकर्त्यांना आणखी कोठडीत ठेवणे योग्य नसल्याचेही न्यायालयाने आदेशात म्हटले.

सर्व याचिकाकर्ते हे गुन्हेगारी वृत्तीचे आणि देशविरोधी कारवाया करणाऱ्या गटाशी संबंधित असल्याचे पुरावे सादर करण्यात फिर्यादी पक्ष अयशस्वी ठरला आहे. मूळात कथित घटना घडली त्या ठिकाणाहून हिंदू ताफा जाणे हा योगायोग होता. त्यामुळे, ताफ्यात सहभागी असलेल्यांवर हल्ला करण्याचा कोणताही पूर्वनियोजित कट असल्याचे मानता येणार नाही, असे सकृतदर्शनी मत न्यायालयाने नोंदवले.

## SPORT

### World's richest cricketer retires at 22 with $8.8 billion net worth, surpassing Sachin, Kohli and Dhoni



**NEW DELHI:** World's richest cricketer retired at 22: Names like Sachin Tendulkar, MS Dhoni, and Virat Kohli come to mind when we think of cricket. They are also among the richest cricketers. However, they are not the wealthiest cricketer in the world. There's another, who retired at 22 and never played IPL, with a net worth of around $8.8 billion. He is Aryaman Birla.

Son of billionaire Kumar Mangalam Birla, Aryaman is the world's wealthiest cricketer. In 2023, he joined the Aditya Birla Group as a director at ABFRL. He also serves on the boards of Aditya Birla Management Corporation and Grasim Industries. Before entering business, Aryaman pursued a cricket career, even scoring a century in first-class cricket.

Born in Mumbai in July 1997, Aryaman moved to Rewa, Madhya Pradesh. He participated in the junior circuit and made his senior debut in the Ranji Trophy against Odisha in November 2017. He shared a 72-run opening partnership with Rajat Patidar in his first innings.

A year later, he gained recognition at Eden Gardens against Bengal. After Bengal declared at 510/9, Madhya Pradesh were forced to follow on. Birla scored an unbeaten 103, leading to a draw. Aryaman Birla expressed his joy at being recognized for his skills rather than his family name. He started enjoying cricket more as people acknowledged his talent. "Performances are the best way to earn trust and respect," he stated.

# Joe Root vs Sachin Tendulkar : Comparing 2 batting icons' numbers after 151 Tests

**New Delhi -** Star English batter Joe Root is steadily marching toward cricketing greatness, drawing comparisons to the legendary Sachin Tendulkar. With his stunning performances post-COVID, Root has scaled the heights of Test cricket, scoring runs around the globe with flair and consistency. Handing over England's captaincy to Ben Stokes has proven to be a blessing, allowing Root to channel his energy solely into his batting.

With a century in the second Test against New Zealand, Root's Test career tally now stands at 12,886 runs in 151 matches, placing him fifth on the all-time run-scorers list. He is just 492 runs shy of overtaking Ricky Ponting at No. 2, and at his current scoring pace, the milestone seems within reach. Since 2021, Root has been in scintillating form, amassing 5,063 runs in 54 Tests at an average of 56.25, with 19 centuries. Former England captains





Alastair Cook and Michael Vaughan have already tipped him to challenge Tendulkar's record of 15,921 runs. Tendulkar remains the only player to have scored more than 50 centuries in Tests, retiring with 51 centuries and 68 half-centuries. Let's look at how the numbers of the two batting icons stack up after 151 Test matches. By the 151st Test of their careers, Root batted in 30 more innings than Tendulkar and accumulated 12,886 runs, surpassing the Indian great's 11,939 runs. However, Tendulkar maintains a higher average of 54.02, compared to Root's 50.93, and has more centuries (39 vs 36). On the other hand, Root has scored more half-centuries (64 vs 49) over the same number of matches. AWAY RECORD: After 151 Tests, Sachin Tendulkar had scored 6,821 runs in 87 away Tests at an average of 53.70, with 23 hundreds and 28 fifties. In comparison, Joe Root has amassed 6,128 runs in 73 away Tests at an average of 47.66, including 15 hundreds and 32 fifties. HOME RECORD: When it comes to performances in home conditions, Tendulkar scored 5,118 runs in 64 home Tests at an average of 54.44, with 16 hundred and 21 fifties. On the other hand, Joe Root has scored 6,758 runs in 78 home Tests at an average of 54.94, with 21 hundreds and 32 fifties.

# David Miller puts on a fiery batting show vs Pakistan with his 82 off 40

**New Delhi -** David Miller delivered a scintillating performance in South Africa's T20I series opener against Pakistan on December 10, smashing a breathtaking 82 off 40 balls. His explosive innings at Durban's Kingsmead turned the tide in favour of the Proteas by some extent, after an early top-order collapse.

South Africa, fielding a second-choice side led by stand-in skipper Heinrich Klaasen in Aiden Markram's absence, struggled initially after opting to bat first. Reeza Hendricks managed just 8 runs, Matthew Breetzke fell for a duck, and Rassie van der Dussen failed to make an impact, leaving the hosts in a precarious position. The situation worsened when Klaasen departed for 12 after being dismissed by Abbas Afridi. At 56/4, the Proteas looked in trouble.



Miller, however, came to the rescue with a sensational counter-attack. From the moment he walked in, he dominated the Pakistan bowlers with an array of powerful strokes, electrifying the Durban crowd. The standout moment of his innings came against leg-spinner Abrar Ahmed, whom Miller hammered for 21 runs in a single over, including three consecutive sixes. His ability to find the boundary with ease and rotate the strike ensured that South Africa regained momentum despite their early setbacks.

Miller's knock, laced with boundaries and towering sixes, seemed destined for a century. However, his remarkable innings came to an end in the 14th over when Shaheen Afridi trapped him with a well-executed delivery. By the time Miller was dismissed, he had set an imposing platform for South Africa, helping them recover from a shaky start.



### Got worried for Mohammed Siraj after Travis Head send-off: Ricky Ponting

**New Delhi -** Ricky Ponting claimed that he actually got worried for Mohammed Siraj after his animated send-off for Travis Head during the Adelaide Test. Siraj and Head were battling it out on the field with the ball and bat during the over when the Indian pacer was finally able to dismiss the Aussie batter with a yorker. After this, both men ended up having a fiery exchange.

Siraj was booed for the rest of the game as Australia went on to win the match by 10 wickets in the end, thanks to Head's 140. Speaking to the ICC Review, Ponting said that it was accidental with the way things panned out in the end. The former Aussie skipper felt that there was no malice at the start of things and the misinterpretation led to how the incident finally unfolded. "Looking back at it now, I think it was accidental the way that whole thing played out," Ponting said. "I don't think there was any malice meant at the start. Then the way it started and almost like the misinterpretation of what had actually gone on, I think led to how it ended."

"I know Travis has gone and said that he said 'well bowled' at the start," Ponting said. "Siraj obviously wasn't happy about being hit over the deep backward square for six the ball before. Rohit (Sharma) I'm sure would expect these fast bowlers to react like that. When they're under the pressure and they're getting hit and then they've just got a wicket you'd expect that they'd be up and about." Ponting said that he got worried about Siraj given how the umpires don't like to see such incidents happen on the field. "I was in comms (commentary box) at the time. As soon as I saw the send-off, I actually got worried for Siraj. I know how the umpires react to those things. Umpires and referees don't like seeing the send-off, pointed in the direction of the dressing room."

# Aryna Sabalenka crowned WTA Player of the Year 2024

**New Delhi -** Aryna Sabalenka secured the prestigious WTA Player of the Year award for the first time. This recognition comes after a remarkable season where she clinched two Grand Slam titles and finished 2024 as the world's number one ranked player.

Other awards, determined by votes from tennis media, were also announced. Emma Navarro earned the Most Improved Player accolade. Paula Badosa was named Comeback Player of the Year.

Lulu Sun received the Newcomer of the Year award. The Doubles Team of the Year honor went to Sara Errani and Jasmine Paolini.

Sabalenka, the 26-year-old Belarusian tennis star, triumphed at the Australian Open in January and the US Open in September. These Grand Slam victories were complemented by two other titles during the season.

She compiled an impressive 56-14 win-loss record, amassing nearly $10 million in prize money. Her consistent performance propelled her to overtake Iga Swiatek for the top ranking in October.

Emma Navarro achieved a significant milestone by breaking into the WTA's top 10 in September. This achievement followed her remarkable run at the US



Open, her best Grand Slam performance to date.

During the US Open, Navarro defeated defending champion Coco Gauff in the fourth round. Her impressive run eventually ended in the semifinals against Aryna Sabalenka.

The 23-year-old American, who honed her skills in South Carolina and won the 2021 NCAA singles championship at the University of Virginia, secured her first WTA tour title in Hobart, Australia, in January. She began 2024 ranked 32nd and finished the year at number eight.

Paula Badosa's 2023 season was curtailed by a back injury. The 27-year-old Spaniard made a strong comeback in 2024.

Badosa climbed back up the rankings to number 12. She won the title in Washington and matched her best Grand Slam result by reaching the US Open quarterfinals.

Lulu Sun's journey in 2024 saw her rise from outside the top 200 to a career-high ranking of 39. A key highlight of her season was a quarterfinal appearance at Wimbledon in July, where she entered as a qualifier.

The 23-year-old also finished as runner-up at the Monterrey Open in August. Born in New Zealand and raised in Switzerland, Sun contributed to the University of Texas's NCAA team championship victory.

Sara Errani and Jasmine Paolini secured a doubles gold medal for Italy at the Paris Olympics. They also played a crucial role in Italy's Billie Jean King Cup triumph.

The pair reached the French Open doubles final together. In singles competition, Paolini finished as runner-up at both the French Open and Wimbledon.

# रॅगिंगविरोधी नियमांचे पालन न केल्यास कठोर कारवाई

## राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाचा वैद्यकीय महाविद्यालयांना इशारा

● मुंबई, विशाल कारंडे :



वैद्यकीय पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थांकडून मोठ्या प्रमाणावर रॅगिंगविषयक तक्रारी करण्यात येत आहेत. त्यात मानसिक छळाच्या प्रकरणांबरोबरच आत्महत्येच्या घटनांचाही समावेश आहे. याची गंभीर दखल घेत वैद्यकीय महाविद्यालये आणि संस्था विनियम २०२१ मधील रॅगिंग प्रतिबंध आणि प्रतिबंधातील तरतुदींचे पालन न केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने वैद्यकीय महाविद्यालयांना दिला आहे.

पदवी आणि पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांच्या रॅगिंगला आळा घालण्यासाठी आणि रॅगिंग होणाऱ्या विद्यार्थ्यांना याबाबत तक्रार करणे सोपे व्हावे यासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने अँटी-रॅगिंग सेल आणि अँटी-रॅगिंग हेल्पलाइन सुरू केली आहे. यावर मागील काही दिवसांपासून तक्रारींची संख्या वाढत आहे. त्याचबरोबर काही प्रकरणे समाजमाध्यम व वृत्तपत्रातून उघडकीस येत आहेत. या प्रकरणांमध्ये छेडछाड, बळजबरी, मानसिक छळ या प्रकरणांबरोबरच आत्महत्येच्या घटनांचाही समावेश आहे. त्यातच नुकतेच धारपूर येथील जीएमईआर वैद्यकीय महविद्यालयात रॅगिंग प्रकरणातून एमबीबीएसच्या प्रथम वर्षाच्या एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी रॅगिंगविरोधी उपायांची तातडीने कठोर अंमलबजावणी करण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

रगिंगला आळा घालण्यासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने नियमावली तयार केली आहे. मात्र त्याची अमलबजावणी होत नसल्याचे वाढत्या प्रकरणातून निदर्शनास आले आहे. महाविद्यालयांमधील अपुरी देखरेख यंत्रणा, रॅगिंगविरोधी पथकांची अनुपस्थिती, महाविद्यालयांकडून सादर होत नसलेला रॅगिंगविरोधी वार्षिक अहवाल, प्रभावीपणे रॅगिंग निर्मूलनासाठी पुढाकार घेण्यात अपयशी ठरलेली महाविद्यालये आदी विविध कारणांमुळे रॅगिंगच्या प्रकरणांमध्ये वाढ होत आहे.


### रॅगिंगला आळा घालण्यासाठी केल्या सूचना

■ रॅगिंगविरोधी यंत्रणा मजबूत करण्यासाठी पथके तयार करावी, रॅगिंगविरोधी धोरणांबद्दल प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांमध्ये व्यापक जनजागृती करावी, वार्षिक अहवाल वेळेवर सादर करावा, विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या छळापासून मुक्त आणि शिक्षणासाठी सुरक्षित आणि अनुकूल वातावरण तयार करण्याच्या सूचना संबंधितांना करण्यात आल्या आहेत.

# वेद राही यांना साहित्य अकादमी फेलोशिप

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

साहित्य अकादमीचा सर्वोच्च सन्मान असलेली साहित्य अकादमी फेलोशिप (महत्तर सदस्यता) प्रख्यात डोगरी लेखक श्री. वेदराही यांना प्रदान करण्यात येणार आहे. गुरुवारी दिनांक १२ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता श्री. वेदराही यांच्या निवासस्थानी (बी- ३०३, जास्मिन, सुदर्शन स्काय गार्डन, जी. बी. रोड, ठाणे (पश्चिम), मुंबई - ४००६१५.) हा कार्यक्रम होईल. यावेळी साहित्य अकादमीचे अध्यक्ष डॉ. माधव कौशिक यांच्या हस्ते श्री. वेदराही यांना प्रशस्तीपत्रासह ताम्रपट प्रदान करण्यात येणार असून साहित्य अकादेमीचे सचिव डॉ. के. श्रीनिवासराव हे प्रशस्तीपत्राचे वाचन करतील.




श्री. वेदराही हे एक प्रख्यात डोगरी लेखक, विचारवंत, कवी, दिग्दर्शक आणि चित्रपट निर्माता आहेत. डोगरी, हिंदी आणि उर्दू या भाषांवर त्यांचे प्रभुत्व असून ते या तिन्ही भाषेत लेखन करतात. वेदराही यांचा जन्म मे १९३३ मध्ये झाला. मूळचे ते जम्मू कश्मीरचे आहेत. त्यांचे वडील दिवंगत मुल्कराज सराफ यांना जम्मू आणि काश्मीरमधील पत्रकारितेचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांनी १९२४ मध्ये रणबीर या नावाने जम्मू आणि काश्मीर राज्यातील पहिले वृत्तपत्र सुरू केले. १९७६ मध्ये त्यांच्या वडिलांना भारत सरकारने पद्मश्री या पुरस्काराने सन्मानित केले होते. लेखन, मुद्रण, प्रकाशन या बाबींचा कुटुंबातूनच वारसा मिळालेल्या श्री. वेदराही यांना त्यामुळेच साहित्य आणि पत्रकारितेत रुची निर्माण झाली. गेली सहा दशके श्री. वेदराही सातत्याने उर्दू, डोगरी आणि हिंदी भाषेत सृजनशील लेखन करत आहेत. त्यांना लहानपणापासूनच लेखनाची आवड होती. त्यांनी वयाच्या बाराव्या-तेराव्या वर्षी उर्दू आणि नंतर हिंदी, डोगरी भाषांमध्ये लेखन करण्यास सुरुवात केली. चित्रपट आणि साहित्यात सहा दशकांहून अधिक काळ गाजवलेल्या कारकिर्दीत, वेदराही यांनी पाच चित्रपटांच्या दिग्दर्शनासह २५ चित्रपटांचे लेखन केले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून डॉ. माधव गाडगीळ यांचे युएनईपीच्या पुरस्कारासाठी अभिनंदन

## पर्यावरण रक्षणासाठी झटणाऱ्या महाराष्ट्र सुपुत्राचा गौरव

● मुंबई, यश सावंत :



'पर्यावरण रक्षणासाठी अव्याहतपणे झटणाऱ्या महाराष्ट्र सुपुत्राला आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेचा 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' जीवनगौरव पुरस्कार मिळणे देश आणि राज्यासाठी अभिमानास्पद आहे,' अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांचे अभिनंदन केले आहे. शुभेच्छा संदेशात मुख्यमंत्री म्हणतात, संयुक्त राष्ट्र संघटनेच्या युनायटेड नेशन्स एन्व्हायर्न्मेंट प्रोग्रामतर्फे (यूएनईपी) प्रतिष्ठेच्या 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' पुरस्कारांमध्ये जगभरातील सहा मान्यवरांच्या यादीत डॉ गाडगीळ जीवनगौरव पुरस्काराचे मानकरी ठरणे हे निश्चितच आपल्या सर्वांसाठी गौरस्वापद आहे.

यातून डॉ गाडगीळ यांच्या कार्याचा उचित सन्मान झाला आहे. पर्यावरण, जैवविविधतेचे रक्षण हा त्यांचा ध्यास राहीला आहे. त्याला त्यांनी जीवनकार्य मानले आहे. यातूनच ते गेली अनेक दशके या क्षेत्रात अथकपणे संशोधन करत आहेत. विशेषतः पश्चिम घाट क्षेत्रातील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील, जैवविविधतेबाबत त्यांनी केलेले काम मार्गदर्शक, दिशादर्शक राहीले आहे. यातून आपल्या सर्वांना पर्यावरण रक्षण, जतन संवर्धनासाठी प्रोत्साहन आणि प्रेरणा मिळत राहणार आहे. यापुढेही डॉ गाडगीळ या क्षेत्रात मोलाची योगदान देत राहतील, असा विश्वास आहे.

# दापोलीत ५० टक्के जागांचे मालक परप्रांतीय

● दापोली, सुचित शिंदे

दापोली तालुक्यातील शेतकरी अल्पभूधारक होताना दिसत आहे वडिलोपार्जित शेकडो एकर जागा कवडीमोल भावाने विकत आहेत. एका सर्वेक्षणातून ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. सद्यस्थितीत तालुक्यातील ५० टक्क्यांहून अधिक जागांचे मालक हे परराज्यातील किंवा अन्य जिल्ह्यांतील आहेत. तालुक्यात असणाऱ्या मोक्याच्या जागा या आधीच बळकावल्या गेल्या आहेत. त्यामुळे दापोलीत स्थानिकांचे अस्तित्व जवळपास संपुष्टात येताना दिसत आहे.



तालुक्यात १०५ ग्रामपंचायती आणि १७३ गावे आहेत. या १७३ गावांमध्ये अन्य राज्यातील लोकांनी जमिनी खरेदी केल्याचे व्यवहार झाले आहेत. त्यामुळे अनेक ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात घरे, रो -हाऊसेस, बंगलो, बांधकामाच्या नोंदी दर महिन्याला होताना दिसत आहेत. शेकडो एकर जागा खरेदी केलेले परप्रांतीय मालकांना गाव पातळीवर विरोध होऊ नये म्हणून मंदिर, सार्वजनिक इमारती, सार्वजनिक सुविधा अशा ठिकाणी ते देणगी देत असून स्थानिक पुढाऱ्यांचे 'खिसेही गरम' केले जात असल्याची चर्चा सुरु आहे.

तालुक्यातील अनेक जागांचे व्यवहार हे बनवाबनवी करून झाले असल्याचीही ओरड होताना दिसत आहे. स्थानिकांकडून खरेदी केलेल्या जागेवर विकसकांनी रो-हाऊसेस, बंगलो बांधून शेकडो लोकांना त्याची विक्री केली आहे. यातील अनेक ठिकाणी विकसकांना विक्री केलेल्या जागेत जागा मालक मजूर म्हणून राबताना दिसत आहेत.

तालुक्यातील पूर्वजांनी शेकडो एकर जागा आपल्या पुढील पिढीसाठी जतन करून ठेवल्या होत्या. अगदीच गरज भासली तर जागा गहाण ठेवली जात होती आणि अशा जमिनी सोडवून ती परत मिळवली जात होती. मात्र आता त्याच वडिलोपार्जित जागा विकून स्थानिक लोक मुंबईसारख्या ठिकाणी खोली विकत घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. गावातील जागा विकल्याने तालुक्यातील अनेकांचे कायम वास्तव्य हे मुंबईत होताना दिसत आहे. गावाला केवळ सणासुदीला तो येताना दिसत आहे. शासनाकडून मिळणाऱ्या धान्यामुळे तालुक्यातील शेतीही ओसाड पडण्याच्या मार्गावर आहे. अशा प्रकारे शेती ओसाड ठेऊन करायची काय म्हणून ती विकली जात असून भावी पिढीसाठी चिंतेचे बाब ठरली आहे.

आपल्या पूर्वजांनी पुढच्या अनेक पिढ्यांचा विचार करून जागा विकल्या नाहीत. भरपूर शेती केली. मात्र, जागा विकून त्यातून पैसे कमवू हा हव्यास त्यांनी बाळगला नाही. मात्र, आपल्या डोळ्यांदेखत विकला जात असलेला तालुका पाहून डोळ्यात पाणी येत आहे. यामुळे पुढच्या पिढीला 'गाव ही नाही आणि मुंबई देखील नाही ' अशी अवस्था होणार आहे.

# ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाचे ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन शाळा क्रमांक ४४, वर्तक नगर येथे सुरू, गुरुवार १२ डिसेंबर रोजी होणार सांगता

● ठाणे, रोहित जैसवाल :

ठाणे महानगरपालिका शिक्षण विभाग आयोजित ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन शाळा क्रमांक ४४, वर्तक नगर येथे आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन बुधवार, ११ डिसेंबर रोजी करण्यात आले. या प्रदर्शनात, ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाच्या एकूण ९३ प्राथमिक शाळा, २१ माध्यमिक शाळा, ८ खाजगी प्राथमिक व ८ खाजगी माध्यमिक अशा एकूण १३० शाळांचा सहभाग आहे.

प्रदर्शनाचे उद्‌घाटन उपायुक्त (शिक्षण) सचिन सांगळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी, शिक्षणाधिकारी कमलकांत म्हेत्रे, प्रमुख वक्ते प्रा. सलील सावरकर, गट अधिकारी संगीता बामणे आदी उपस्थित होते. उद्घाटन समारंभानंतर, सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रयोगांचे व प्रकल्पांचे अवलोकन करून विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले.



आपले सगळे जीवन हे विज्ञानावर अवलंबून असून विज्ञानाची भूमिका अतिशय मोलाची आहे. या प्रदर्शनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागेल आणि त्यांना त्यास अधिक रस निर्माण होईल, असे प्रतिपादन उपायुक्त सांगळे यांनी केले. तर, आपण विज्ञानाची सृष्टी घेतली असून आता विज्ञानाची दृष्टीही घेण्याची आवश्यकता शिक्षणाधिकारी कमलकांत म्हेत्रे यांनी व्यक्त केली. चांदीबाई कॉलेज, उल्हासनगर येथील प्राध्यापक सलील सावरकर यांनी आपल्या वक्तृत्वातून श्रद्धा आणि विज्ञान यांची सांगड घालणारा प्रसंग कथन करीत, विज्ञानाची महती विशद केली.

या कार्यक्रमात, गेल्या वर्षी विज्ञानमंच उपक्रमांतर्गत इस्रो येथे शैक्षणिक सहलीसाठी गेलेल्या विद्यार्थ्यपैकी दोन विद्यार्थिनींनी अनुभव कथन केले. प्राथमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सुनील फापाळे यांनी या विद्यार्थिनीना बक्षीस जाहीर केले. तसेच, मान्यवरांच्या हस्ते ते त्या विद्यार्थिनीना प्रदान करण्यात आले.

गुरूवार, १२ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या विज्ञान प्रदर्शनात सर्व शाळांमधील विद्यार्थी व शिक्षकांनी उस्फूर्त सहभाग घेतला आहे. त्यांच्या प्रयोगांचे व प्रकल्पांचे परीक्षण परीक्षक करणार आहेत. उत्कृष्ट प्रयोगांना ठाणे महापालिका शिक्षण विभागाकडून बक्षीसे दिली जाणार आहेत. उद्‌घाटन कार्यक्रमात ठाणे मनपा शाळा क्रमांक ४४ च्या विद्यार्थिनींनी ईशस्तवन व स्वागत गीत सादर केले. गट क्रमांक ८च्या गटप्रमुख अनघा पालांडे यांनी आभार प्रदर्शन केले. तर, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ठाणे मनपा शाळा क्रमांक १२०चे शिक्षक सुरेश पाटील यांनी केले.

# महिला व बालविकास विभागामार्फत पीडित महिलांसाठी पाच समुपदेशन केंद्र

● ठाणे, सम्यक कासारे :

महिला व बालविकास विभागामार्फत २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात महिलांसाठी विशेष योजना अंतर्गत महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालवण्यात येत आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने जिल्ह्यात पाच समुपदेशन केंद्र सुरू असून प्रत्येक केंद्रासाठी संस्थेमार्फत समुपदेशक, विधीसल्लागार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कौटुंबिक हिंसा, छळ, मारहाण आदी प्रकारांनी त्रासलेल्या महिलांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञ मार्गदर्शक नेमले गेले आहेत. नियुक्त कर्मचारी, अधिकारी पीडित महिलांची समस्या जाणून घेतात. महिलेस असलेली समस्या? त्यावर कायदेशीर मार्ग कोणते आहेत? याबाबत सल्ला दिला जातो. एकंदरीत सल्ला घेण्यासाठी आलेल्या या महिलांना सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशन या केंद्रात केले जाते. महिलांचे समुपदेशन करण्यासाठी कार्यालयीन वेळेत कामकाज सुरू असल्याची माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागुल यांनी दिली. महिलांना कायदेशीर मदत, मानसोपचार तज्ज्ञांची मदत, पोलिसांची मदत मिळवून दिली जाते. यासाठी जिल्हा पातळीवरील संस्थेला विधी सल्लागार व समुपदेशन यांना प्रत्येकी दरमहा बारा हजार रुपये, तर तालुका पातळीवरील संस्थेला प्रत्येकी ९ हजार रुपये मानधन दिले जात आहे.

**ठाणे जिल्ह्यातील पाच समुपदेशन केंद्राचे नाव व पत्ता -**

-कौटुबिक समुपदेशन केंद्र भारतीय महिला फेडरेशन (ठाणे समिती), सार्वजनिक बांधकाम विभाग दुसरा मजला, ठाणे (प)

-कौटुबिक समुपदेशन केंद्र भारतीय महिला फेडरेशन (ठाणे समिती), महिला व बाल सहाय्य केंद्र पंचायत समिती कार्यालय पहिला माळा, कल्याण

-महिला विकास केंद्र संस्थेचे समुपदेशन/ सल्लागार केंद्र, एकात्मक बाल विकास सेवा योजना, पंचायत समिती शहापुर, जि. ठाणे

-आश्रय महिला संस्था ,तहसिल कार्यालय बिल्डींग, अंबरनाथ पंचायत समिती कार्यालय, 3 रा मजला, के. बी. रोड, अंबरनाथ, जि. ठाणे

-वननिकेतन संस्थेचे चेतना महिला समुपदेशन व कुटुंब सल्ला केंद्र सरकारी दवाखान्या शेजारी ता. मुरबाड जि. ठाणे पीडित महिला व मुलींना आधार देण्याच्या उद्देशाने समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आले असून पीडित महिलांनी या समुपदेशन केंद्रास भेट द्यावे, असे आवाहन महिला व बालविकास विभागामार्फत करण्यात येत आहे.

# संपूर्ण महाराष्ट्रात १६ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२४ मध्ये कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र हा कार्यक्रम राबविणार

● ठाणे, रोहित जैसवाल :




ठाणे महानगर पालिकेतील १७ आरोग्य केंद्रात कुसुम कार्यक्रम दिनांक १६ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२४ पर्यंत रबविण्यात येत आहे.यात १०४०९ लोकसंख्येची तपासणी करण्यात येणार आहे.मिरा भायंदर महानगर पालिकेतील एकूण १३ आरोग्य केंद्रात १२१७९ लोकसंख्या तर भिवंडी निजामपूर महानगर पालिकेतील १९ आरोग्य केंद्रातील ६४५८ लोकसंख्या तपासण्यात येईल.या मोहिमेत मिळालेल्या संशयितकुष्ठ रुग्णाची लगेचच तपासणी करून कुष्ठरुग्ण आढळल्यास औषधोपचार आणण्यात येईल. समाजात कामकाजनिमित्त स्थलांतरित होत राहिलेल्या घटकांत सर्वेक्षण करून लवकरात लवकर कुष्ठरुग्ण शोधून त्याला औषधं उपचारखाली आणून कुष्ठरोग प्रसाराची साखळी तोडणे हाच या मोहिमेचा उद्देश आहे.



महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाचे अध्यक्ष तथा सेन्ट्रल रेल्वे कमिटी सदस्य ZRUCC Member अभिजीत धुरत यानी आज ११ डिसेंबर २०२४ रोजी कल्याण रेल्वे स्टेशनला व स्टेशन मॅनेजर मिना साहेबाना भेट दिली कल्याण स्टेशन च्या विविध समस्या बाबत चर्चा करण्यात आली,यावेळी महिला अध्यक्षा अरुणाताई गोफणे. कोकण विभाग अध्यक्ष विजय सुर्वे, जेष्ठ कायकर्ते रमेशबाबा शिरकर, कल्याण मुरबाड रेल्वे उपाध्यक्ष जयपाल आठवले व मोठ्या संख्येने रेल्वे प्रवासी उपस्थित होते